# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१९

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**राज्यात मुत्रपिंड, हेपॅटायटिस बी, एड्सच्या रुग्णांना राजीव गांधी आरोग्य जीवनदायी योजनेअंतर्गत उपचार मिळत नसल्याबाबत**

**(१) ३५२०२ (२३-०१-२०१६). श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मुत्रपिंड,हेपॅटायटिस-बी,एड्स रुग्णांना राजीव गांधी आरोग्य योजने मार्फत उपचार मिळत नसल्याने रुग्णांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार मुत्रपिंड, हेपॅटायटिस-बी, एड्स रुग्णांना राजीव गांधी आरोग्य योजनेअंतर्गत पुर्ण क्षमतेने व मोफत उपचार मिळावेत म्हणुन शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (३०-०८-२०१९) :** (१) महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत (पुर्वीची राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना) मुत्रपिंड प्रत्यारोपणासाठी रु.२.५० लाखपर्यंत विमा संरक्षण (दात्याच्या शस्त्रक्रियेसह) अनुज्ञेय आहे.राष्ट्रीय कार्यक्रमात अंतर्भुत असलेल्या आजारांचा समावेश राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेमध्ये करण्यात आलेला नाही. राष्ट्रीय एड्स नियंत्रण कार्यक्रमांतर्गत HIV रुग्णाला औषधोपचार ART केंद्रामध्ये मोफत देण्यात येतात. राष्ट्रीय हेपॅटायटिस नियंत्रण कार्यक्रमांतर्गत शासकीय रुग्णालयांमध्ये मोफत रुग्णांची चाचणी व औषधोपचार करण्याची तरतुद केंद्र शासनामार्फत प्रकल्प अंमलबाजवणी आराखडा मान्यतेनुसार करण्यात येणार आहे.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अकोला जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागातील वरीष्ठ लिपीकाने बनावट प्रमाणपत्र सादर केल्याबाबत**

**(२) ३५८०७ (२३-०१-२०१६). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागातील वरीष्ठ लिपीकाने जिल्हा शल्य चिकित्सक अकोला, यांचे बनावट प्रामणपत्र सादर केल्याचे प्रकरण दिनांक २८ ऑक्टोबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हा शल्य चिकित्सकांकडून वितरीत करण्यात येत असलेल्या बनावट प्रमाणपत्रे तयार करण्याच्या अनेक घटना घडल्या आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त बनावट प्रमाणपत्र तयार करणाऱ्या रॅकेटबाबत जिल्हाशल्य चिकित्सकांनी अशा अनेक तक्रारीकडे दुर्लक्ष केले, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय तसेच चौकशीअंती काय आढळून आले,

(५) असल्यास, सदर प्रकरणी शासन काय कार्यवाही करणार आहे ?

**श्री. एकनाथ शिंदे (३०-०८-२०१९) :** (१) होय. अकोला जिल्हा परिषदेतील कनिष्ठ सहाय्यक यांनी सादर केलेले अपंगत्व प्रमाणपत्र हे बनावट असल्याचे निष्पन्न झाले आहे. या अनुषंगाने संबंधित कनिष्ठ सहाय्यकास कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली असून त्यावर त्याने सादर केलेल्या स्पष्टीकरणाच्या आधारे सदर कर्मचाऱ्याची एक वेतनवाढ रोखण्यात आली आहे.

(२) अंशत: खरे आहे.

जिल्हा शल्य चिकित्सक यांचेकडे बनावट प्रमाणपत्राची दोन प्रकरणे निदर्शनास आली आहे. त्यानुसार पोलीस अधिक्षक, अकोला आणि एस.टी. महामंडळ यांना कळविण्यात आले आहे.

(३) हे खरे नाही.

जिल्हा शल्य चिकित्सक अकोला कार्यालयाकडुन कोणत्याही प्रकारचे बनावट प्रमाणपत्र तयार करण्यात येत नाही. बनावट प्रमाणपत्राबाबत तक्रारींकडे दुर्लक्ष करणेत येत नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भिवंडी (जि.ठाणे) येथील स्व. इंदिरा गांधी स्मृती रुग्णालयास २०० खाटांची मान्यता मिळण्याबाबत**

**(३) ५१७६६ (११-०५-२०१६). श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी (जि.ठाणे) येथील स्व. इंदिरा गांधी स्मृती रुग्णालयास २०० खाटांची मान्यता मिळाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केवळ रुग्णालयाची इमारत शासनाने हस्तांतरीत न झाल्याने सुविधा उपलब्ध होत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यावर शासनाने तात्काळ कोणती कार्यवाही केली वा उपाययोजना केली आहे ?

**श्री. एकनाथ शिंदे (१६-०७-२०१९) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही. सद्यस्थितीत उपजिल्हा रुग्णालय, भिवंडी येथे बाहरुग्ण सुविधा, आंतरुग्णसेवा, बालरुग्ण कक्ष, अपघात कक्ष, शस्त्रक्रिया विभाग, एस,एन.सी.यु कक्ष, सि.टी. सी प्रयोगशाळा सुविधा, दंतचिकीत्सा विभाग, प्रसुती विभाग, लिंक ए.आर.टी.,कुष्ठरोग तपासणी इत्यादी आरोग्य विषयक सुविधा पुरविण्यात येतात.
(३) २०० खाटांच्या श्रेणीवर्धीत रुग्णालयासाठी इमारतीची दुरुस्ती व विस्तारीकरणाचे काम जिल्हा नियोजन समितीच्या मंजूर अनुदानातून करण्याची कार्यवाही सुरु आहे.

---

**राज्यात मोटार बाईक रुग्णवाहिका योजना सुरु करण्याबाबत**

**(४) ५५४५८ (०१-०९-२०१६). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खाजगी रुग्णालयांकडून होणारी गरीब रुग्णांची लूट थांबवण्यासाठी शासन नवीन कायदा करणार असून उपचारासाठी किती शुल्क असेल याची यादीच प्रत्येक रुग्णालयात लावली जाणार आहे त्याचा भंग करणा-यांवर कारवाई केली जाईल तसेच मुंबईत मोटर बाईक रुग्णवाहिका योजना सुरु करण्यात येणार असल्याचे आश्वासन मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री यांनी दिल्याचे माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री यांनी दिलेल्या आश्वासनाची अंमलबजावणी करुन त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (३१-०८-२०१९) :** (१) हे खरे आहे.
(२) महाराष्ट्र राज्यामध्ये मोटार बाईक रुग्णवाहिका सेवा दि.०२ ऑगस्ट, २०१७ पासून सुरु करण्यात आली आहे. सद्यस्थितीमध्ये ३० मोटार बाईक रुग्णवाहिकेद्वारे एकूण १३,७१७ रुग्णास रुग्ण सेवा देण्यात आलेली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### वाशिम जिल्ह्यातील जिल्हा सामान्य रुग्णालयामधील ट्रामा केअर युनिटबाबत

**(५) ६८३२३ (२७-०१-२०१७). श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम जिल्ह्यातील जिल्हा सामान्य रुग्णालयामध्ये ट्रामा केअर युनिट मंजूर आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या ट्रामा केअर युनिटसाठी आवश्यक असलेली व्हेंटीलेटर, कार्डीयाक, मॉनीटर, सोनाग्राफी प्लस ओवस मीटर यासारखी करोडो रूपयांची साधन सामुग्री उपलब्ध असुनही वर्ग २ ते वर्ग ४ पर्यंतच्या कर्मचाऱ्यांच्या रिक्त पदामुळे रुग्णालय बंद असुन त्याचा विपरीत परिणाम रूग्ण सेवेवर होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ट्रामा केअर युनिटसाठी आवश्यक असलेली रिक्त पदे भरण्यासंदर्भात जिल्हा शल्यचिकीत्सकाकडून वारंवार शासनाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास,याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१४-०८-२०१९) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

ट्रामा केअर युनिट जिल्हा रूग्णालयाशी संलग्न असल्याने जिल्हा रूग्णालयाचे अधिकारी व कर्मचारी यांच्या सेवा उपलब्ध करून दिल्या जातात.

(३) हे खरे नाही.

वैद्यकीय अधिका-याची मंजूर १५ पदांपैकी वैद्यकीय अधिकारी, गट ०२ पदे, अस्थिव्यंग़ शल्य चिकित्सक, गट अ ०१ पद बधिरिकरण शास्त्रज्ञ गट अ ०२ पदे अशी एकूण ०५ पदे भरली असून वर्ग ३ व वर्ग ४ ची रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरू आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### मेळघाट (जि.अमरावती) येथे भरारी पथकांमध्ये वैद्‌यकीय अधिकारी यांची नियुक्ती करण्याबाबत

**(६) ६८५०२ (२७-०१-२०१७). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मेळघाट (जि.अमरावती) येथील कुपोषण निमूर्लनसोबतच होणारे बालमृत्यु व मातामृत्यु थांबविण्याबाबत नियुक्त केलेल्या भरारी पथकांचे वाहने व वाहनातील वैद्‌यकीय अधिकारी नसल्याने येथील बालमृत्युचे प्रमाण कमी झाले नसल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भरारी पथके वाहनांवर इंधन व दुरूस्तीचा खर्च दाखवून शासकीय निधीचा अपहार करीत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, येथील वैद्यकीय अधिकारी आदिवासींना सेवा देण्याऐवजी मुख्यालयी व रहाता घरीच बसून शासकीय सेवा घेत आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करून या भरारी पथकातील दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१२-०७-२०१९) :** (१) हे, खरे नाही.

मेळघाटात (जि.अमरावती) येथे २२ भरारी पथकामध्ये २२ मानसेवा वैद्यकीय अधिकाऱ्यांची नियुक्ती केली आहे.

(२) हे, खरे नाही.

२२ भरारी पथकांना २२ वाहने भाडयाने पुरविण्यात आली आहे.

(३) हे, खरे नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुर्तिजापूर (जि.अकोला) तालुक्यातील उपजिल्हा रुग्णालयाची जमीन शासनाकडे वर्ग करण्याबाबत**

**(७) ७२३८८ (२७-०१-२०१७). श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुर्तिजापूर (जि.अकोला) तालुक्यातील उपजिल्हा रुग्णालयाची जमीन शासनाकडे वर्ग करण्याबाबत सार्वजनिक आरोग्यमंत्री यांच्या दालनामध्ये दिनांक १० ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्यासुमारास बैठक झाली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या बैठकीमध्ये शासनाला आवश्यक ती जमीन रुग्णालयासाठी ठेवून उर्वरित जमीन शासनाला, जिल्हाधिकारी यांना देण्यात यावी असा निर्णय घेण्यात आला, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, रुग्णालया व्यतिरक्त असलेली जमीन शेती प्रयोजनाकरिता देण्याबाबत लोकप्रतिनिधी यांनी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१४-०८-२०१९) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.
(४) उप संचालक, आरोग्य सेवा, अकोला मंडळ, अकोला यांच्या दि. १२.०८.२०१४ च्या पत्रान्वये रूग्णालयाला आवश्यक असलेली २.८७ हे. आर. जमीन ठेवून उर्वरीत ५४.२५ हे. आर. जमीन जिल्हाधिकारी, अकोला यांच्याकडे हस्तांतरीत करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## भंडारा जिल्हयात जिल्हा आरोग्य अधिकारी व वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे रिक्त असल्याबाबत

**(८) ७४८३० (१५-०४-२०१७). श्री.राजेश काशीवार (साकोली), श्री.चरण वाघमारे (तुमसर), श्री.कृष्णा गजबे (आरमोरी), श्री.रामचंद्र अवसरे (भंडारा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भंडारा जिल्हयातील जिल्हा आरोग्य अधिकारी पदासह सहाय्यक जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांची ४ पदे व वैद्यकीय अधिकाऱ्यांची ११ पदे रिक्त असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिल्हयातील अतिसंवेदनशील नक्षलभागातील नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने जिल्हयातील रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०९-०८-२०१९) :** (१) हे अशत: खरे आहे.

आरोग्य विभाग जिल्हा परिषद भंडारा अंतर्गत महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ व गट-ब मध्ये एकूण ७८ पदे मंजूर असून, त्यापैकी ६८ पदे भरलेली आहेत व १० पदे रिक्त आहेत. रिक्त पदांमध्ये जिल्हा आरोग्य अधिकारी पदासह ४ पदे व वैद्यकिय अधिकाऱ्यांची ६ पदे समाविष्ट आहेत.

तसेच, भंडारा जिल्हयातील आरोग्य विभागात राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत कंत्राटी पध्दतीने विशेषज्ञ व वैद्यकीय अधिकाऱ्यांची ७२ पदे भरण्यात आली आहेत.

(२) महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ (ग्रेड पे रु. ६६००) मधील जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी व विशेषज्ञ संवर्गातील रिक्त पदे भरण्यासाठी सदर पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कार्यकक्षेतून ३ वर्षासाठी (दि. ३०.९.२०२१ पर्यंत) वगळून ती स्वतंत्र निवडमंडळामार्फत भरण्याबाबत शासनाने निर्णय घेतला आहे. त्यानुसार सरळसेवेची पदे निवडमंडळामार्फत भरण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ मधील पदोन्नतीच्या वाटयावरील पदे भरावयाची कार्यवाही सुरु आहे.

महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-अ (ग्रेड पे रु. ५४००) मधील वैद्यकीय अधिकाऱ्यांची ८७७ पदे भरण्यासाठी जाहिरात देण्यात आली आहे. तसेच सद्य:स्थितीत सदर पदे ११ महिन्याच्या कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने भरण्याबाबत उपसंचालक आरोग्य सेवा यांना संचालनालय स्तरावरुन कळविण्यात आले आहे.

तसेच गट-क व गट-ड संवर्गातील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही उपसंचालक स्तरावर सुरु आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पनवेल (जि.रायगड) तालुक्यात वैद्यकीय सेवा पुरविताना डॉक्टराना पीओएस (पॉइट ऑफ सेल) मशिन नसल्याबाबत**

**(९) ७५१८१ (१५-०४-२०१७). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पनवेल (जि.रायगड) तालुक्यात वैद्यकीय सेवा पुरविताना डॉक्टरानांच रोकड विरहीत व्यवहारासाठी आवश्यक असलेल्या पीओएस (पॉइट ऑफ सेल) मशिन मिळाली नसल्याने अनेक अडचणी निर्माण होत असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय
(२) असल्यास, नोटा बंदी नंतर अनेकांचा कल रोकड विरहीत व्यवहाराकडे असताना व बँकेतील पैसे काढण्याची मर्यादा लक्षात घेता कार्डने व्यवहार करण्यासाठी डॉक्टरांकडे पीओएस (पॉइट ऑफ सेल) मशिन उपलब्ध नसल्यामुळे रुग्णांची दयनीय अवस्था आहे, हे ही खरे आहे काय
(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२५-०६-२०१९) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही

---

**उल्हासनगर (जि.ठाणे) येथील मध्यवर्ती रुग्णालयाच्या दुरुस्तीच्या कामांकरिता निधी उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(१०) ७६३७२ (१२-०४-२०१७). श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उल्हासनगर (जि.ठाणे) येथील मध्यवर्ती रुग्णालयाच्या दुरुस्तीकरिता निधी उपलब्ध करण्याबाबत सार्वजनिक आरोग्य विभागाकडे पाठपुरावा करण्यात येईल असे दिनांक २३ जुलै, २०१५ रोजी वा त्यासुमारास मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांनी घोषीत केले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निधी अद्यापपर्यंत सार्वजनिक बांधकाम विभागास हस्तांतरित झालेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कामासाठी निधी उपलब्ध करून देण्यास झालेल्या विलंबामुळे सदर अंदाजपत्रकाची किमंत वाढून १ कोटी, १७ लाख रुपये झाली असून वाढीव अंदाजपत्रक उपसंचालक, आरोग्य विभाग यांच्याकडे सादर करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त अंदाजपत्रकास मान्यता देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१६-०७-२०१९) :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) व (४) अंशत:खरे आहे.

सदर दुरुस्तीचे अंदाजपत्रक तयार करुन मध्यवर्ती रुग्णालय, उल्हासनगर यांनी उपसंचालक, आरोग्य सेवा, मुंबई मंडळ, ठाणे यांना सादर केले होते, तथापि सदर प्रस्तावामध्ये त्रुटी असल्याने मध्यवर्ती रुग्णालय, उल्हासनगर यांना परत करण्यात येवून सार्वजनिक बांधकाम विभागाकडून सुधारित अंदाजपत्रक प्राप्त करुन घेण्याबाबत कळविण्यात आले होते. त्यानुसार सार्वजनिक बांधकाम विभाग, ठाणे यांच्याकडून सुधारीत अंदाजपत्रक प्राप्त करुन घेवून सदर दुरुस्ती कामासाठी वाढीव किंमतीसह रु.१,१९,९०,७७०/- इतक्या रक्कमेस शासन निर्णय दि.१३.०७.२०१७ अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## आंबेगांव (जि.पुणे) तालुक्यातील अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना आर्थिक मदत मिळणेबाबत

**(११) ७६८९८ (१३-०४-२०१७). श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आंबेगांव (जि.पुणे) तालुक्यातील ४९ गावांमध्ये माहे जुलै-ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान झालेल्या अतिवृष्टीच्या नुकसानीबाबतचा अहवाल कृषी संचालक, विस्तार व प्रशिक्षण, कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे जिल्हाधिकारी, पुणे यांनी माहे नोव्हेंबर-डिसेंबर २०१६ मध्ये वा त्यादरम्यान पाठविला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या अहवालाचे स्वरुप काय आहे,
(३) असल्यास, अतिवृष्टीमुळे ज्या शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे त्यांना देण्यात आलेल्या मदतीचे स्वरुप काय आहे,
(४) असल्यास, सदर मदत दिली नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत
(५) असल्यास, ज्या शेतकऱ्यांना अद्‌याप मदत मिळाली नाही त्यांना मदत देण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. सुभाष देशमुख (२६-०७-२०१९) :** (१) होय.
(२) माहे जुलै २०१६ ते माहे ऑक्टोबर २०१६ च्या सुमारास झालेल्या अतिवृष्टीमुळे पुणे जिल्ह्यातील आंबेगांव तालुक्यासह खेड, जुन्नर, वेल्हा तालुक्यातील खरडून/वाहून गेलेल्या जमिनीचे क्षेत्र ५२.३१ हेक्टर व शेतजमिनीवरील वाळूचा/गाळाचा/ मातीचा थर ३ इंचापेक्षा अधिक जमा झालेल्या जमिनीचे क्षेत्र १९.१२ हेक्टर असल्याचे निदर्शनास आले.
(३), (४) व (५) माहे जुलै २०१६ ते माहे ऑक्टोबर २०१६ च्या सुमारास झालेल्या अतिवृष्टीमुळे पुणे जिल्ह्यातील आंबेगांव तालुक्यासह खेड, जुन्नर, वेल्हा तालुक्यातील खरडून/वाहून गेलेल्या जमिनीमुळे बाधित झालेल्या आपदग्रस्तांना मदत देण्याची कार्यवाही शासनस्तरावर सुरु आहे.

---

### वरणगाव (ता. भुसावळ) येथील ग्रामीण रुग्णालयातील असुविधेबाबत

**(१२) ८२४०५ (१८-०४-२०१७). श्री.अमर काळे (आर्वी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वरणगाव (ता.भुसावळ) येथील ग्रामीण रुग्णालयातील असुविधामुळे रुग्णांची गैरसोय होत असल्याने याबाबत कार्यवाही करण्याची मागणी दिनांक ३० जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास मा.मंत्री महोदयांकडे निवेदनामार्फत केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निवेदनाच्या अनुषंगाने सदर रुग्णालयात डॉक्टरांची पदे कायमस्वरुपी भरण्याबाबत व सोई सुविधा देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१४-०८-२०१९) :** (१) हे खरे नाही.
(२) वैद्यकीय अधिक्षकचे मंजूर पद रिक्त असून वैद्यकीय अधिकारीच्या मंजूर ३ पदांपैकी २ पदे भरली असून १ पद रिक्त आहे. रिक्त पदांच्या भरतीबाबत कार्यवाही सुरू आहे. ग्रामीण रूग्णालय, वरणगाव चे मुख्य इमारतीचे बांधकाम नव्याने करण्यात येत असून सदर रूग्णालयाच्या आंतररूग्ण कक्ष, ऑपरेशन थिएटर व विस्तारीकरणाकरीता जिल्हा नियोजन विकास मंडळामार्फ़त सन २०१८-१९ मध्ये रू. ७० लक्ष अनुदान मंजूर करण्यात आले आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाकडून निविदा प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. सद्यस्थितीत रूग्णांना नवीन इमारतीच्या पोर्च असलेल्या पॅसेजमध्ये निवारा तयार करून खाटा टाकून रूग्णसेवा उपलब्ध करून देण्यात येते.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### लातूर जिल्ह्यातील आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा सक्षम करण्याबाबत

**(१३) ८३९१२ (१३-०४-२०१७). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर जिल्हयातील आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा औद्योगिक क्षेत्रात घडलेल्या घटनेत प्रतिरोध करणाऱ्या आधुनिक साधनांच्या अभावी असक्षम ठरत असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हा प्रशासनाची आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा नैसर्गिक आणि रस्ते दुर्घटनेला सामोरे जाऊ शकेल एवढीच तिची क्षमता आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, औद्योगिक क्षेत्रात कोणती दुर्घटना घडू शकते आणि त्याचा प्रतिरोध करण्यासाठी कोणती यंत्रणा आवश्यक आहे याची माहिती घेऊन शासनाने लातुर येथील आपत्ती व्यवस्थापन यंत्रणेला आवश्यक साधने पुरविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (१७-०६-२०१९) :** (१) नाही.

(२) नाही.

(३) व (४) लातूर जिल्हयातील आपत्त्ती व्यवस्थापन यंत्रणेकडे Foam Tender, Smoke detector, Breathing Operator set, Cutting tools, Nose Mask, Chemical suit इ. आवश्यक साधने उपलब्ध आहेत. नैसर्गिक आपत्त्ती, भूकंप पूर दुष्काळ, वादळे तसेच रस्ते अपघात चेंगराचेंगरी आग व इतर दुर्घटना इत्यांदीना सामोरे जाण्यसाठी जिल्हा आपत्त्ती व्यवस्थापन यंत्रणा सक्षम आहे.

---

**बुलढाणा व मोताळा (जि.बुलढाणा) तालुक्यातील सार्वजनिक आरोग्य विषयक निर्माण होणा-या समस्यांबाबत**

**(१४) ८६५९२ (१९-०८-२०१७). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा व मोताळा (जि.बुलढाणा) तालुक्यातील सार्वजनिक आरोग्य विषयक निर्माण होणा-या समस्यांबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १० मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री यांना निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीत काय निष्पन्न झाले,

(३) असल्यास, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१४-०८-२०१९) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) मौजे रोहिणखेड व मौजे कोथळी येथे दि. २५.०७.२०१७ च्या शासन निर्णयान्वये नवीन प्राथमिक आरोग्य केंद्र मंजूर करण्यात आले असून सदर ठिकाणी जागा उपलब्ध करून घेण्याची कार्यवाही सुरू आहे.

बुलढाणा जिल्हा सामान्य रूग्णालयातील गट- अ, गट-ब, गट क व गट ड ची रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरू आहे.

बुलढाणा येथील महिला व बाल रूग्णालयाच्या इमारतीचे बांधकाम प्रगतीपथावर असून दि.१६.०२.२०१८ च्या शासन निर्णयान्वये सदर रूग्णालयाकरीता पदनिर्मिती करण्यात आली आहे. तसेच दि. २४.०७.२०१८ च्या शासन निर्णयान्वये सदर रूग्णालयाकरीता यंत्रसामुग्री खरेदीकरीता प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून हाफ़कीन जीव औषध महामंडळ यांच्या स्तरावर पुढील कार्यवाही सुरू आहे.

बुलढाणा येथील क्षय आरोग्य धाम रूग्णालयातील तीन कक्षांच्या नुतनीकरणासंदर्भात कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी सादर केलेल्या अंदाज आराखड्यांची किंमत जास्त असल्याने तुलनात्मक प्रस्ताव सादर करण्याबाबत अधिक्षक अभियंता, राष्ट्रीय आरोग्य अभियान यांना कळविले आहे.

एच.आय.व्ही. बांधित रूग्णांना मोफ़त एस.टी. प्रवास सवलत गृह विभागाच्या दि.०९.१०.२०१८ च्या शासन निर्णयान्वये देण्यात आली आहे.

आरोग्य विभागाच्या प्रचलित बायोमेडिकल उपकरणांच्या निकषानुसार एम. आर. आय मशिन खरेदी करण्याचे धोरण नाही. सबब जिल्हा रूग्णालय, बुलढाणा येथे एम. आर. आय. मशिन पुरविणे शक्य नाही.

सन २०११ च्या जन गणनेवर आधारीत आरोग्य संस्थांचा जोड-बृहत आराखडा तयार करण्याची कार्यवाही आरोग्य सेवा संचालनालय स्तरावर सुरू असून ग्रामीण रूग्णालय, मोताळा चे ५० खाटांच्या श्रेणीवर्धन करण्याची मागणी निकषानुसार जोड-बृहत आराखड्यामध्ये समाविष्ट करण्याची कार्यवाही सुरू आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## बुलढाणा जिल्हयातील रूग्णांच्या तुलनेत खाटांची संख्या कमी असल्याबाबत

**(१५) ९१४०८ (१९-०८-२०१७). श्री.राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्हयातील सर्व शासकीय रूग्णालये व प्राथमिक आरोग्य केंद्रात आंतररुग्ण व बाहयरूग्ण मिळुन दररोज सुमारे ४०१० रूग्णावर उपचार केला जातो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मात्र रूग्णांच्या तुलनेत खाटांची संख्या कमी असल्यामुळे तसेच विविध संवर्गातील रिक्त पदांमुळे बहुतांश वेळी रूग्णांना उपचारासाठी खाजगी रूग्णालयांत भरती झाल्यामुळे आर्थिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने रूग्णांसाठी खाटांची संख्या वाढविण्यासोबतच येथील रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१६-०८-२०१९) :** (१) व (२) हे खरे आहे.

बुलढाणा जिल्ह्यामध्ये ५३ प्राथमिक आरोग्य केंद्रे, १२ ग्रामीण रूग्णालये, ३ उपजिल्हा रूग्णालये, १ जिल्हा रूग्णालय व २८० उपकेंद्रे कार्यरत आहेत. एप्रिल २०१८ ते सप्टेंबर २०१८ मध्ये बुलढाणा जिल्ह्यातील एकूण ६५,२४३ आंतररूग्ण व ४,९८,००१ बाह्यरूग्णांवर उपचार करण्यात आले आहेत.

उक्त सर्व आरोग्य संस्थांमध्ये तज्ञ डॉक्टरांसह अधिकारी व कर्मचारी वर्ग पुरेशा प्रमाणात उपलब्ध असून उपचारार्थ येणा-या रूग्णांना आवश्यक त्या सोई सुविधा उपलब्ध करून देण्यात येतात.

(३) दि. १७.०१.२०१३ च्या शासन निर्णयान्वये मंजूर सन २०११ च्या बृहत आराखड्यानुसार बुलढाणा जिल्ह्यामध्ये ०५ प्राथमिक आरोग्य केंद्रे तसेच माहे जुलै २०१७ मध्ये ०२ प्राथमिक आरोग्य केंद्रे असे एकूण ०७ प्राथमिक आरोग्य केंद्रे नव्याने मंजूर झालेली आहेत. सदरची प्राथमिक आरोग्य केंद्रे कार्यरत झाल्यानंतर त्या ठिकाणी खाटांची संख्या ७० होणार आहे. सन २०११ च्या लोकसंख्येच्या आधारे सुधारीत जोडबृहत आराखडा तयार करण्यात येत असून त्यामध्ये वाढीव लोकसंख्येनुसार नवीन आरोग्य संस्था प्रस्तावित करण्याची कार्यवाही सुरू आहे.

तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावरील रिक्त वैद्यकीय अधिकारी यांची पदे तसेच इतर संवर्गतील पदे भरण्याची कार्यवाही सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## संगमेश्वर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील ग्रामीण रुग्णालयाच्या इमारतीच्या दुरुस्तीबाबत

**(१६) ९१६०९ (१९-०८-२०१७). श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संगमेश्वर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील ग्रामीण रुग्णालयाच्या इमारतीची दुरवस्था झालेली आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, मुंबई-गोवा महामार्गावर असलेल्या या ग्रामीण रुग्णालयाची दुरुस्ती वा नुतनीकरण करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२५-०६-२०१९) :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत वेळोवेळी तात्पुरती दुरुस्ती करण्यात आली आहे.इमारत जुनी झाल्याने ग्रामीण रुग्णालय, संगमेश्वर च्या इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्यात आले असून त्यानुसार सदर इमारतीचे दुरुस्तीचे अंदाजपत्रक तयार करण्याची कार्यवाही सार्वजनिक बांधकाम विभाग, रत्नागिरी यांचेस्तरावर चालू आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अकोला रुग्णालय तपासणी धडक मोहिमेअंतर्गत जिल्हयातील**
**१०४ रुग्णालयांनी त्रुटीची पुर्तता करण्याबाबत**

**(१७) ९१८७७ (१९-०८-२०१७). श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला रुग्णालय तपासणी धडक मोहिमेअंतर्गत जिल्हयातील १०४ रुग्णालयांमध्ये त्रुटी आढळून आल्या असून या रुग्णालयांनी सात दिवसांच्या आत त्रुटीची पूर्तता न केल्यास कायदेशीर कारवाई करावी, असा आदेश जिल्हाधिकारी यांनी दिनांक २० मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या आदेशानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, केलेल्या सदरहू कार्यवाहीचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१०-०७-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) धडक मोहिम तपासणीत त्रुटया आढळून आलेल्या १०४ रुग्णालय/ दवाखाने यांना त्रुटयांची पुर्तता करण्याबाबत नोटीस देण्यात आलेल्या आहेत.

(३) जिल्हास्तरीय समितीच्या निर्णयानुसार विहित कालावधीत त्रुटयांची पूर्तता न केलेल्या रुग्णालय/दवाखाने त्रुटयांची पूर्तता होईस्तोवर पुर्णत बंद ठेवण्याबाबतच्या सूचना जिल्हा शल्य चिकित्सक, अकोला कार्यालयामार्फत देण्यात आल्या आहेत आणि डॉ.भोरे रा.मुर्तिजापुर व डॉ.हलदार रा.वाडेगांव त्यांच्यावर एफआयआर दाखल करण्याबाबत तालुका आरोग्य अधिकारी, बाळापुर यांना सुचित करण्यात आले आहे. तसेच ज्या रुग्णालये/ दवाखाने यांनी त्रुटींची पूर्तता केली आहे त्यांना त्यांच्याच पॅथीच्या अनुषंगाने रुग्णसेवा देण्याची परवानगी देण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**बुलढाणा जिल्हा अपंग केंद्रांतर्गत वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या अनुपस्थितीबाबत**

**(१८) ९२७८८ (१८-०८-२०१७). श्री.राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्हा अपंग पुनर्वसन केंद्रात वैद्यकीय अधिका-यांच्या अनुपस्थितीमुळे येथे प्रमाणपत्र घेण्यासाठी येणा-या अंध व अपंगाना नोंदणी, तपासणी न करताच परत जावे लागत असल्याचे माहे मार्च, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे येथील अंध व अपंगाना शासकीय सलवतीपासून वंचित रहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या संदर्भात चौकशी करून सदर केद्रात वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी कार्यालयीन वेळेत उपस्थित राहावेत यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१३-०६-२०१९) :** (१) हे खरे नाही. जिल्हा रूग्णालय, बुलढाणा येथे मार्च, २०१७ मध्ये दिव्यांग प्रमाणपत्र मिळणेसाठी एकूण ४०० अर्ज प्राप्त झाले होते. त्यापैकी ३८१ दिव्यांग व्यक्तींना दिव्यांगत्व प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले व उर्वरित १९ अर्ज रद्द करण्यात आले. मार्च २०१७ चे कोणेतेही अर्ज बुलढाणा जिल्हा रूग्णालयाकडे प्रलंबित नाहीत.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**तिवसा (जि.अमरावती) येथील प्राथमिक आरोग्य उपकेंद्र निंबारो रेलवाडी (ता.तिवसा) येथे स्थलांतरीत करण्याबाबत**

**(१९) ९३४३२ (२१-०८-२०१७). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तिवसा (जि.अमरावती) येथे नगरपंचायत झाल्यामुळे येथील प्राथमिक आरोग्य उपकेंद्र निंबारो रेलवाडी (ता.तिवसा) येथे स्थलांतर करण्याकरिता स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी जिल्हा आरोग्य अधिकारी जिल्हा परिषद, अमरावती यांना दिनांक २५ एप्रिल, २०१६ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने सदर निवेदनावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१४-०८-२०१९) :** (१) हे खरे आहे.
(२) जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांचेकडून स्थलांतराचा प्रस्ताव दि.२७.०६.२०१७ च्या पत्रान्वये या संचालनालयास प्राप्त झाला होता परंतू तो अपूर्ण असल्याने चेकलिस्टनुसार / ठरावासह परिपूर्ण प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना या कार्यालयाच्या दि.११.०८.२०१७ च्या पत्रान्वये देण्यात आल्या आहेत.
(३) कार्यवाही सुरु आहे.

---

**बुलढाणा येथील जिल्हा सामान्य रूग्णालयात महिला रूग्णांची होत असलेली गैरसोय**

**(२०) ९६०४४ (०६-०१-२०१८). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बुलढाणा येथील जिल्हा सामान्य रूग्णालयात महिला रूग्णांची संख्या वाढली असून महिला कक्षात दोन रूग्णांना एकाच खाटेवर ठेवण्याची वेळ रूग्णालय प्रशासनावर आली असल्याचे माहे ऑगस्ट २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू रुग्णालयात संसर्गजन्य रूग्णांच्या कक्षात इतरही रूग्णांना भरती करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या संदर्भात शासनाने चौकशी करून महिला व संसर्गजन्य रूग्णांसाठी आवश्यक दोन कक्षांची निर्मिती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१६-०८-२०१९) :** (१) हे खरे आहे.

सामान्य रूग्णालय, बुलढाणा येथील महिला कक्षातील प्रसूती कक्षाचे बांधकाम ब्रिटिशकालीन असून सप्टेंबर २०१७ मध्ये पावसामुळे छताचा काही भाग कोसळला होता. त्यामुळे खबरदारीचा उपाय म्हणून कक्षातील महिला रूग्णांना इतर कक्षात हलविण्यात आले होते. त्यावेळी काही अपवादात्मक परिस्थितीत व तात्पुरत्या स्वरूपात काही खाटांवर दोन रूग्ण ठेवण्यात आले होते. सदर प्रसुती कक्षाच्या दुरूस्तीकरीता रू. ५,९०,०००/- इतक्या अनुदानाच्या प्रस्तावावर कार्यवाही सुरू आहे. सदर प्रसूती कक्ष पर्यायी इमारतीत पूर्ववत सुरू आहे.
(२) हे खरे नाही.
(३) महिला कक्ष व संसंर्गजन्य कक्ष हे दोन्ही कक्ष स्वतंत्रपणे कार्यरत आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक शहरापासून ४० ते ५० किमी च्या परिघात झालेल्या भूकंपाच्या केंद्रबिंदूचा तपास लागत नसल्याबाबत**

**(२१) १०४९९० (१७-०४-२०१८). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक शहरापासून ४० ते ५० किमी च्या परिघात ३.२ रिश्टर स्केल तीव्रतेचा भूकंप झाल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आपत्ती व्यवस्थापन विभागाकडून सदर भूकंप केंद्रबिंदूचा प्रशासकीय सुट्टी असल्यामुळे प्रशासनाच्या कोणत्याही विभागाकडे तपास लागत नसल्याचे कारण दिले जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, आपत्ती व्यवस्थापन विभाग कोणत्याही शासकीय सुट्टीच्या दिवशी पूर्णपणे बंद असतो काय,
(४) नसल्यास, नाशिक परिसरातील भूकंपाचा केंद्रबिंदू नक्की न समजण्याची कारणे काय आहेत तसेच भविष्यात अशा आपत्तीच्या घटना घडल्या तर खबरदारी म्हणून शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या आहेत वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (०४-०७-२०१९) :** (१) अंशत: खरे आहे.

मात्र भूकंपाच्या धक्याचे अंतर नाशिक पासून ६४ कि.मी. होते.
(२) नाही.
(३) नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

भूकंपाच्या केंद्रबिदू काढण्यासाठी नाशिक, डिंभे व अक्कलपाडा या ३ वेधशाळांची माहिती उपलब्ध करुन घेण्यात आली होती. त्यानुसार या भुकंपाचे केंद्रबिंदूची माहिती खालीलप्रमाणे आहे.

अक्षांश-१७ अंश ५६.४५-उत्तर रेखंश-७३ अंश .१३.१४- पुर्व महता-३.४

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बुलढाणा व मोताळा (जि.बुलढाणा) तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक/माध्यमिक शालेय विद्यार्थ्यांची प्राथमिक आरोग्य तपासणीबाबत**

**(२२) १०७६०९ (०७-०४-२०१८). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा व मोताळा (जि.बुलढाणा) तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या व इतर व्यवस्थापनाच्या प्राथमिक/माध्यमिक शाळांमध्ये प्राथमिक आरोग्य केंद्रमार्फत राबविल्या जाणाऱ्या शालेय आरोग्य तपासणीमध्ये हृदयरोग, मधुमेह व त्वचारोगाची लक्षणे असले विद्यार्थी आढळून आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वैद्यकीय तपासणीमध्ये गंभीर आजाराचे लक्षणे आढळून आलेल्या किती विद्यार्थ्यांवर उपचार करण्यात आले आहेत,

(३) असल्यास, सदर विद्यार्थ्यांना जिल्ह्याचे ठिकाणी वैद्यकीय सुश्रुषा उपलब्ध असलेल्या संदर्भ रुग्णालयात तपासणीकरिता पाठविण्यात आले आहे काय,

(४) असल्यास, शासनाने याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०५-०७-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) एकूण ७८०७३ विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी केली. त्यात बुलढाणा तालुक्यातील ३५ व मोताळा तालुक्यातील १२ असे मिळून ४७ हृदयरोग संशयीत असलेले विद्यार्थी आढळून आले. बुलढाणा तालुक्यातील - ८ व मोताळा तालुक्यातील ४ विद्यार्थ्यांच्या मार्च, २०१८ अखेर पर्यंत शस्त्रक्रिया करुन घेण्यात आल्या आहेत.

तसेच मोताळा तालुक्यातील २ हृदयरोग असलेल्या विद्यार्थ्यांवर वैद्यकीय उपचार (Medical Treatment) करण्यांत आल्या आहेत. तसेच त्वचारोग असलेले एकुण ३२८ विद्यार्थी आढळून आले असून त्यापैकी ३२६ रुग्णांवर शाळेतच तपासणी नंतर उपचार करण्यांत आले आहेत. उर्वरीत २ विद्यार्थ्यांना जिल्हा रुग्णालय येथे संदर्भीत करुन तंज्ञ डॉक्टरांमार्फत उपचार पुर्ण करण्यांत आले आहेत.

मधुमेह असलेले एकही विद्यार्थी आढळून आलेला नाही.

(३) होय.

हृदयरोग असलेल्या विद्यार्थ्यांवर आचार्य विनोबा भावे वैद्यकीय महाविद्यालय वर्धा, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अकोला व ज्युपीटर हॉस्पीटल, मुंबई या ठिकाणी उपचार करण्यांत आलेले आहेत.

त्वचारोग असलेल्या विद्यार्थ्यांना जिल्हा रुग्णांलयांमध्ये संदर्भीत करण्यांत आलेले आहे.

(४) महाराष्ट्रात राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रमांतर्गत अंगणवाडी मुलांमुलींची वर्षातून २ वेळा तपासणी केली जाते व शाळेतील मुलामुलींची वर्षातून एकदा आरोग्य तपासणी केली जाते.

आरोग्य तपासणीमध्ये जी मुले आजारी सापडतात त्यांना शाळेतच उपचार दिले जातात. व ज्यांना संदर्भ सेवा देणे आवश्यक आहे त्यांना ग्रामीण रुग्णालय अथवा जिल्हा रुग्णालय येथे शिबीर घेवून त्यांचे रोगनिदान निश्चीत केले जाते. त्यानंतर त्यामुलांवर विविध स्तरावरील रुग्णालंयामध्ये वैद्यकीय उपचार अथवा आवश्यकतेनुसार शस्त्रक्रीया केली जाते व ज्यांचे उपचार जिल्हा रुग्णालयात उपलब्ध नाहीत त्यांना महात्मा फुले जन आरोग्य योजना संलग्न रुग्णालयांमध्ये उपचार उपलब्ध करुन दिले जातात. ज्या मुलांना पेडीएट्रीक सर्जन ची गरज असते, त्या मुलांना इंडियन असोसिएशन ऑफ पेडीएट्रीक सर्जन (IAPS) करार केला असल्याने IAPS मार्फत सर्व जिल्हयांना पेडीएट्रीक सर्जन उपलब्ध करुन देण्यांत आले आहेत.

(५) लागू नाही.

---

## अहमदनगर महानगरपालिकेच्या कै.बाळासाहेब देशपांडे महिला प्रसुतीगृह रुग्णालयासाठी निधीची केलेली मागणी

**(२३) ११०२१४ (१२-०४-२०१८). श्री.संग्राम जगताप (अहमदनगर शहर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर महानगरपालिकेचे कै.बाळासाहेब देशपांडे महिला प्रसुतीगृह रुग्णालयासाठी निधीची मागणी अनेक वर्षापासून शासनाकडे प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२४-०७-२०१९) :** (१) हे अंशत: खरे आहे.

केंद्र शासनास प्रस्ताव सादर केला आहे.

(२) राष्ट्रीय आरोग्य अभियान या केंद्र पुरस्कृत कार्यक्रमांतर्गत प्रसुतीगृहाचे नवीन इमारतीचे बांधकाम परवानगी व निधी उपलब्धतेसाठी सन २०१९-२० प्रकल्प अंमलबजावणी आराखडयामध्ये प्रस्ताव केंद्र शासनास सादर करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पुणे जिल्हयातील प्राथमिक आरोग्य केंद्रातील कंत्राटी वाहनचालकांचे वेतन अदा करण्याबाबत**

**(२४) ११०४६८ (३१-०३-२०१८). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हयातील प्राथमिक आरोग्य केंद्रात वाहनचालकाचे काम करणा-या ७४ कंत्राटी वाहनचालकांचा मागील तीन महिन्यापासूनचे वेतन थकीत असल्याचे दिनांक १५ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या वाहनचालकांना किमान वेतनपेक्षा ही कमी वेतन मिळत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन वाहन चालकांचे थकीत वेतन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२०-०७-२०१९) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) निविदेमध्ये मंजूर दराप्रमाणे कंत्राटदारामार्फत वाहनचालकास वेतन अदा करण्यात येते.वाहन चालकांचे थकीत वेतन अदा करण्यात आलेले आहे. कंत्राटी वाहनचालकास दरमहा १० तारखेला वेतन अदा करण्याबाबत लेखी आदेश देण्यात आले असून वेतन अदायगीस ठेकेदाराने केलेल्या दिरंगाईमुळे सदर ठेकेदारास काळ्या यादीत समाविष्ट करण्याची कार्यवाही जिल्हा आरोग्य अधिकारी, पुणे यांचेस्तरावर चालू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सिंधुदुर्ग जिल्हयात शासकिय वैद्यकिय महाविद्यालय उभारण्याबाबत**

**(२५) १११११३ (०५-०४-२०१८). श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्हयात आरोग्य सेवेसाठी १४९ डॉक्टरांची गरज असतांना फक्त ४० ते ५० डॉक्टर कार्यरत असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सर्वसामान्य नागरीकांना रुग्णसेवेसाठी गोवा, कोल्हापूर या ठिकाणी जावे लागत असल्याने सिंधुदुर्ग जिल्हयात शासकिय वैद्यकिय महाविद्यालय उभारण्यात यावेत अशी मागणी सिंधुदुर्ग जिल्हा शासकिय वैद्यकिय महाविद्यालय कृती समितीने जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मा.मुख्यमंत्री यांच्याकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार सदर चौकशीअंती सिंधुदुर्ग जिल्हयात शासकिय वैद्यकिय महाविद्यालय उभारण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१२-०७-२०१९) :** (१) सिंधुदुर्ग जिल्हयात वैद्यकीय अधिकारी गट-अ संवर्गाची एकुण २११ पदे मंजुर असून त्यापैकी १०७ पदे भरलेली आहेत.
(२) होय, हे खरे आहे.
(३) सिंधुदुर्ग येथे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सुरु करण्याची बाब वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या विचाराधीन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भिवंडी (जि.ठाणे) शहरातील स्वर्गीय इंदिरा गांधी स्मृती उपजिल्हा रुग्णालयात केवळ दोन सुरक्षा रक्षक कार्यरत असल्याबाबत**

**(२६) ११६०२४ (०६-०४-२०१८). श्री.शिवाजीराव कर्डिले (राहुरी), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.नारायण कुचे (बदनापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भिवंडी (जि.ठाणे) शहरातील १०० खाटांचे स्वर्गीय इंदिरा गांधी स्मृती उपजिल्हा रुग्णालयात केवळ दोन सुरक्षा रक्षक कार्यरत असल्याने या रुग्णालयाची सुरक्षा धोक्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या रुग्णालयातून दोन वर्षापासून चोरीस गेलेले एक दिवसांचे बाळ अद्यापही सापडले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या रुग्णालयाची सुरक्षा वाढविण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२५-०६-२०१९) :** (१) हे खरे नाही.
स्वर्गीय इंदिरा गांधी स्मृती उपजिल्हा रुग्णालयात ६ सुरक्षा रक्षक कार्यरत आहेत.
(२) हे खरे आहे.
(३) सद्यस्थिती सुरक्षा रक्षकांची संख्या वाढवण्यात आली असून १२ सी.सी.टी.व्ही.कॅमेरे बसविण्यात आले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई, नवी मुंबई व ठाणे येथील रुग्णालयात अपंगत्वाचे प्रमाणपत्र देणाऱ्या केंद्रांच्या उभारणीबाबत**

**(२७) ११६८७२ (२६-०७-२०१८). ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.नरेंद्र महेता (मिरा भाईंदर), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर),**

**श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगर प्रदेशातील अपंग व्यक्तींना अपंगत्वाचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी मुंबई, नवी मुंबई व ठाणे येथील एकूण आठ रुग्णालयांमध्ये ऑनलाईन पद्धतीने प्रमाणपत्र देण्याची सुविधा सुरु करण्याचे शासनाने जाहीर केले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निर्णयाला सात महिने झाले असुनही पुरेशा केंद्रांची उभारणी करण्यात आली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबई महानगर प्रदेशात जे.जे. रुग्णालयातच अपंगत्वाचे प्रमाणपत्र देणारे केंद्र असल्याने अपंग व्यक्तींना फार काळ रांगेत उभे रहावे लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मुंबई, नवी मुंबई व ठाणे येथील रुग्णालयांमध्ये अपंगत्व प्रमाणपत्र देणारी केंद्र तात्काळ कार्यन्वित करण्यासाठी कोणत्या उपाययोजना करण्यात आल्या वा येत आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१३-०८-२०१९) :** (१) होय.

सा.आ. वि., शासन निर्णय दिनांक १७ ऑक्टोबर, २०१७ नुसार मुंबई, नवी मुंबई व ठाणे येथील ०८ रुग्णालयांना दिव्यांगांना दिव्यांगत्व (अपंगत्व) प्रमाणपत्र सुविधा सुरु करण्यास शासन मान्यता देण्यात आलेली आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

मुंबई येथे जे.जे. रुग्णालयाखेरीज बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या रा.ए.स्मा. रुग्णालय, सायन रुग्णालय, नायर रुग्णालय, कुपर रुग्णालय व राजावाडी रुग्णालय, घाटकोपर येथे सदर केंद्राची उभारणी करण्यात आली असून www.swavlamban.gov.in या संगणकीय प्रणालीद्वारे दिव्यांगांना अपंग प्रमाणपत्रे वितरीत करण्यात येतात. तसेच नवी मुंबई येथील जनरल हॉस्पीटल, वाशी, येथे दिव्यांग प्रमाणपत्र सुविधा कार्यान्वित झाली आहे. तथापि, ठाणे महानगरपालिकेची ०२ रुग्णालयात (शिवाजी रुग्णालय, कळवा व लोकमान्य टिळक हॉस्पीटल, ओरस, ठाणे) दिव्यांग प्रमाणपत्र केंद्रे कार्यान्वित झालेली नाहीत.

(३) हे खरे नाही.

मुंबई येथे जे.जे. रुग्णालयाखेरीज बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या ०५ रुग्णालयातुन तसेच केंद्र शासनाच्या अली यावर जंग, बांद्रा येथे कर्णबधिरता दिव्यांग प्रमाणपत्र उपलब्ध होतात अशा प्रकारे बृहन्मुंबई मध्ये एकुण ०७ ठिकाणी दिव्यांग प्रमाणपत्र देण्याची सुविधा आहे. सदर प्रमाणपत्र संगणकीय प्रणालीद्वारे देण्यात येत असल्याने अपंग व्यक्तींना फार काळ रांगेत उभे रहावे लागत नाही.

(४) मुंबई व नवी मुंबई येथे दिव्यांग प्रमाणपत्र सुविधा कार्यान्वित झाली असून फक्त ठाणे महानगपालिकेच्या ०२ रुग्णालयात दिव्यांग प्रमाणपत्र कैंद्रे अद्याप सुरु झाली नाहीत. याबाबत मुख्य वैद्यकीय अधिकारी, ठाणे महानगरपालिका यांना उपसंचालक आरोग्य सेवा, मुंबई मंडळ, ठाणे यांच्यामार्फत कळविण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रत्नागिरी जिल्ह्यातील जिल्हा परिषदेअंतर्गत आरोग्य विभागामध्ये कार्यरत असणाऱ्या कंत्राटी वाहन चालकांचे वेतन प्रलंबित असल्याबाबत**

**(२८) १२३२१० (२८-०७-२०१८). श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रत्नागिरी जिल्ह्यातील जिल्हा परिषदेअंतर्गत आरोग्य विभागामध्ये कार्यरत असणाऱ्या कंत्राटी वाहन चालकांना मागील चार-पाच महिने वेतन मिळालेले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, संबधीत विभागाकडे वारंवार मागणी करूनही सदरचे वेतन संबधीत वाहन चालकांना मिळालेले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार सदर वाहन चालकांचे थकीत वेतन मिळण्यासह वेळेत वेतन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०५-०७-२०१९) :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.
(३) उपसंचालक, आरोग्य सेवा, कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांच्याकडील माहे डिसेंबर, २०१८ अखेर रु.५२,८५,०००/-एवढे अनुदान प्राप्त झालेले असून माहे ऑक्टोंबर, २०१८ अखेर सर्व कंत्राटी वाहन चालकांचे वेतन अदा करण्यात आले आहे.
(४) वेतनासाठी लागणाऱ्या निधीची तरतुद व वितरण यास अंशत: विलंबामुळे कंत्राटी कर्मचाऱ्यांचे वेतन अदा करण्यास काहीसा उशीर झाला.

---

**राज्यातील सागरी परीक्षेत्रामध्ये बेकायदेशीरपणे मासेमारी करणाऱ्या बोटींवर कारवाई करण्याबाबत**

**(२९) १२९६१५ (१५-१२-२०१८). श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील सागरी परीक्षेत्रामध्ये बेकायदेशीरपणे मासेमारी करणाऱ्या बोटींवर कारवाई करण्यासाठी सक्षम यंत्रणा नसल्यामुळे निर्बंधित क्षेत्रात विनापरवाना पर्ससिन आणि एलईडी

बोटधारक मासेमारी करत असुन मत्स्यव्यवसाय विभाग त्याकडे दुर्लक्ष करीत आहे, तसेच विनापरवाना यांत्रिक नौका पकडून मत्स्यव्यवसाय विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांकडे रत्नागिरी तसेच सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मच्छीमारांनी अनेक वेळा दिल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एलईडी बोटधारक बंदी असतानाही सिंधुदुर्ग, रत्नागिरी जिल्ह्यातील सागरी क्षेत्रात ती मोठ्या प्रमाणावर होत असून पर्ससिन जाळ्याच्या बोटींना मुंबई सागरी परिक्षेत्रात बंदी असतानाही होत आहे, तसेच बाहेरील राज्यातून होणाऱ्या मच्छीमार बोटींची संख्या मोठी असताना या अनधिकृत आणि विनापरवाना मासेमारी करणाऱ्या बोटीवर कारवाई करण्यासाठी मत्स्यव्यवसाय विभागाकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यात प्रत्येकी केवळ एक बोट व अत्यल्प मनुष्यबळ असल्याचे मत्स्यव्यसाय विभाग उपरोक्त प्रकरणी अपयशी ठरत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्याच्या सागरी क्षेत्रामध्ये बेकायदेशीरपणे मासेमारी करणाऱ्यांविरोधात कायमस्वरूपी आळा घालण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (०१-०७-२०१९) :** (१) अंशत: खरे आहे.

राज्यातील सागरी परिक्षेत्रामध्ये बेकायदेशीरपणे मासेमारी करणाऱ्या नौकांवर विभागामार्फत नियमीत रितसर कारवाई करण्यांत येत आहे.

सिंधुदूर्ग जिल्हयातील मच्छिमारांनी एकूण ४ नौका पकडून विभागास हस्तांतरीत केल्या आहेत. तसेच पोलिस, कोस्ट गार्ड, कस्टम यांच्या गस्ती नौकेस जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांनी मान्यता दिल्यानंतर त्यांच्या गस्ती नौकेसह गस्ती घालुन त्यांनी सन २०१८-१९ मध्ये एकुण ९ परप्रांतीय नौका पकडून दिल्या आहेत.

(२) अंशत: खरे आहे.

परराज्यातून येणाऱ्या नौकांवर महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम, १९८१ अंतर्गत कार्यवाही करण्यात आली आहे. त्यानुसार विभागामार्फत समुद्रामध्ये गस्त घालून बेकायदेशिर मासेमारी करणाऱ्या नौकांवर कडक कार्यवाही करण्यात येत असते.

(३) अंशत: खरे आहे.

(४) उपलब्ध असलेल्या कर्मचाऱ्यांच्या सहाय्याने बेकायदेशिर मासेमारी करणाऱ्याविरुध्द नियमित कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर प्रादेशिक मनोरूग्णालयात मनोरूग्णांचा झालेला मृत्यू**

**(३०) १३१२९६ (११-१२-२०१८). श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील प्रादेशिक मनोरूग्णालयात रूग्णांची प्रकृती सातत्याने बिघडत असुन माहे सप्टेंबर महिन्याच्या सुरवातीपर्यंत २४ मनोरूग्णांचा मृत्यू झाल्याचे माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मनोरुग्णालयात रुग्णांचा सातत्याने मृत्यू होण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२५-०६-२०१९) :** (१) हे खरे आहे.

(२) सदर मृत्यू हे नैसर्गिक मृत्यू, ह्रदयाचे विकार, फुफसांचे विकार, किडनीचे विकार इत्यादी विविध कारणांमुळे झालेले आहेत.

(३) व (४) जिल्हा न्यायाधीश यांचे अध्यक्षतेखाली अभ्यागत समितीपुढे या सर्व मृत्युचा तपशील सादर केला आहे. तसेच सदरकालावधीत मृत्यू झालेल्या मनोरुग्णांचे पोलीस व दंडाधिकारी कार्यालयामार्फत इन्क्वेस्ट पंचनामा करुन शासकीय वैद्कीय महाविद्यालय, नागपूर येथे शव विच्छेदन करण्यात आले आहे. त्यामुळे स्वतंत्र चौकशी करण्यात आली नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पालघर जिल्हयासह राज्यातील इतर जिल्हयात आदिवासी जनतेच्या आरोग्याकरिता मंजूर करण्यात आलेल्या निधीमध्ये झालेलर गैरव्यवहार**

**(३१) १३१९५५ (११-१२-२०१८). श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्हयासह राज्यातील इतर जिल्हयात सन २०१६-१७ व २०१७-२०१८ या कालावधीमध्ये आदिवासी जनतेच्या आरोग्याकरिता मंजूर करण्यात आलेल्या निधीचा योग्य प्रकारे वापर न झाल्याचे माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निधीमधून खरेदी करण्यात आलेली औषधे तसेच आरोग्य दवाखाने अपूर्ण असल्याचे देखील निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील आदिवासी जनतेच्या आरोग्याकरीता मंजूर करण्यात आलेल्या निधीमध्ये गैरव्यवहार झालेला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार पालघर जिल्हयासह राज्यातील इतर जिल्हयात आदिवासी जनतेच्या आरोग्यासाठी मंजूर निधीमध्ये गैरव्यवहार करणा-या संबधितावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१०-०७-२०१९) :** (१) हे अंशत: खरे आहे.

पालघर जिल्हा परिषदेकरीता आदिवासी उपयोजना सन २०१६-१७ व २०१७-१८ मध्ये प्राप्त अनुदानापैकी कमी खर्च झाल्याचे दि.२४.०८.२०१८. रोजीच्या जिल्हा नियोजन समिती बैठकीमध्ये मुददा चर्चेस आला आहे. परंतु राज्यातील पालघर जिल्हयासह सर्व १६ आदिवासी जिल्हयांकरीता मंजूर करण्यात आलेला निधी आदिवासी क्षेत्रातील आरोग्य संस्थांकरीता औषधी खरेदी व सदर क्षेत्रातील संस्थांची बांधकामे व दुरुस्तीकरीता वापरण्यात आलेला आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.

सदर निधीतून आदिवासी क्षेत्रातील आरोग्य संस्थांकरीता औषधी खरेदी करण्यात आली आहे. वित्त विभागाच्या दि.१७.०१.२०१७ च्या शासन आदेशान्वये रु.०.५० लक्ष पेक्षा जास्त रक्कमेच्या खरेदीस निर्बंध असल्याने, ई-निविदेस प्रतिसाद न मिळाल्याने सदर औषधी खरेदी पुर्ण होऊ शकली नाही. परंतु सन २०१६-१७ च्या अखर्चीत निधीतून सन २०१७-१८ या वर्षात जिल्हास्तरावरुन व मेसर्स हाफकीन बायोफार्मा यांचेकडे खरेदीचे अधिकार गेल्यामुळे त्यांचेमार्फत औषधी खरेदी करण्यात आलेली आहे. आरोग्य संस्थांच्या बांधकामास मंजूर असलेला निधी बांधकाम विभागास वर्ग केला जातो.

तरी कामांच्या निविदा प्रक्रीयेस विलंब झाल्याने, बांधकामाचे कार्यारंभ आदेश उशीरा पूर्ण झाल्याने आरोग्य संस्थांची बांधकामे अपूर्ण असल्याचे निदर्शनास आले आहे.
(३) हे खरे नाही.

आदिवासी जनतेच्या आरोग्याकरीता मंजूर करण्यात निधीमध्ये गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आलेले नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मंगी बु. (ता.राजुरा, जि.चंद्रपूर) येथील देवाडा प्राथमिक आरोग्य केंद्राअंतर्गत भरारी पथकास मंजुरी देण्यासंदर्भातील निविदा प्रक्रियेबाबत

**(३२) १३२७०३ (११-१२-२०१८). ॲड.संजय धोटे (राजूरा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मंगी बु. (ता.राजुरा, जि.चंद्रपूर) येथील देवाडा प्राथमिक आरोग्य केंद्रांतर्गत येणा-या भरारी पथकास मंजुरी दिल्यानंतर याबाबतची निविदा प्रक्रिया पुर्ण झाली नसल्याने तपासणी प्रक्रिया थांबल्यामुळे कुपोषीत बालकाच्या शोध मोहीमेस विलंब होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भरारी पथकाचे वाहन तथा वैद्यकिय अधिका-यांची नियुक्ती केल्यानंतर ही पंचायत समिती अंतर्गत निविदा काढण्यात आली नाही, हे खरे आहे काय,
(३) तसेच, निविदा प्रक्रिया पुर्ण करतांना शासकिय सुट्टया लक्षात घेवुन निविदा ऑगस्ट महिन्यात काढण्यात आला परंतु आज पर्यंत निविदा तपासणी केलेली नाही, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, आदिवासी बहुल क्षेत्रातील कुपोषीत बालकांना, गरोदर माता व औषध पुरवठा करण्यास विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली काय व त्याअनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबनाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१०-०७-२०१९) :** (१) हे खरे नाही.

चंद्रपुर जिल्हयातील राजुरा पंचायत समिती अंतर्गत मंगी बु. येथील भरारी पथकामध्ये डॉ.सुजाता मुळे यांची प्रथम नियुक्ती दिनांक ०५/०९/२०१७ ते ३१/०३/२०१८ या कालावधीसाठी करण्यात आली होती. त्यानंतर दिनांक ०४/०४/२०१८ ते ३१/०३/२०१९ या कालावधीसाठी त्यांना पुनर्नियुक्ती देण्यात आली. परंतू डॉ.सुजाता मुळे यांनी राजीनामा दिल्याने रिक्त पदावर डॉ.माधुरी वैदय यांची दिनांक १०/०७/२०१८ ते ३१/०३/२०१९ या कालावधीसाठी नियुक्ती करण्यात आली असून भरारी पथकाकडून नियमित बालके, गरोदर माता व स्तनदा माता यांची तपासणी व उपचार करण्यात येतात.
(२) भरारी पथकाकरीता भाडेतत्वावरील वाहने लावण्यासाठी दिनांक १०/०८/२०१८ रोजी समिती गठीत करुन तालुका आरोग्य अधिकारी कार्यालयाकडून व पंचायत समिती स्तरावरुन निविदा प्रक्रिया करण्यात आली आहे.
(३) भरारी पथकाकरीता भाडेतत्वावरील वाहने लावण्यासाठी तालुका आरोग्य अधिकारी कार्यालयाकडून व पंचायत समिती स्तरावरुन निविदा प्रक्रिया करण्यात आली आहे. तसेच सदर निवीदांची तपासणी करण्यात आली असून, भाडेतत्वावरील वाहन भरारी पथकास पुरविण्यात आले आहे.
(४) भरारी पथकास वाहन उपलब्ध असून औषधांसाठी जिल्हास्तरावरुन प्रती पथक दरमहा २०००/- रु.प्रमाणे पंचायत समिती स्तरावर वितरित करण्यात आलेले आहेत. तसेच आवश्यक असणारी औषधे प्रा.आ.केंद्रामार्फत उपलब्ध करुन देण्यात येतात व त्याद्वारे आरोग्य सेवा पुरविल्या जातात.
(५) प्रश्न उद्भवत नाही.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बीड व नांदेड जिल्हयात विजांच्या कडकडांसह जोरदार पाऊसामुळे नुकसान झालेल्या नुकसानग्रस्तांना मदत देण्याबाबत**

**(३३) १३५४०० (११-०७-२०१९). श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाडयातील जिल्हयात विजांच्या कडकडांसह जोरदार पाऊस झाल्यामुळे बीड व नांदेड जिल्हयात अंगावर विज पडून दोन जणांचा मृत्यु झाला, तसेच काही परिसरात गारपीटही झाल्याने आंबा, भाजीपाला, फळबाग यांचे नुकसान झाले असुन शेतातील पशुधनाचेही नुकसान झाल्याचे दिनांक १७ एप्रिल, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नांदेड शहरातील चैतन्यनगर, व्हीआयपी रस्ता, तरोडा, पावडेवाडी नाका आदी भागात झाडांच्या फांदया तुटून वीजवाहिन्यांवर पडल्याने वीजपुरवठा खंडित झाल्यामुळे संबंधित महावितरणकडून काही दिवसांपासून सुरु असलेल्या बोगस कामाचे स्वरुप निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन नुकसानग्रस्तांना मदत करण्यासह बोगस काम करणाऱ्या संबंधितावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (१४-०८-२०१९) :** (१) माहे एप्रिल, २०१९ मध्ये झालेल्या अवकाळी पाऊस व गारपीटीमुळे औरंगाबाद विभागातील हिंगोली, नांदेड, बीड, लातूर व उस्मानाबाद जिल्ह्यांतील बागायत पिकांखालील एकूण ४६.९० हेक्टर क्षेत्राचे व फळपिकांखालील एकूण ६४४.१९ हेक्टर क्षेत्राचे ३३ टक्क्यांपेक्षा जास्त नुकसान झाले असल्याचे दिसून आले. शासनपत्र दिनांक २३.०४.२०१९ अन्वये माहे एप्रिल, २०१९ मध्ये राज्यात गारपीटीमुळै शेतिपिकांच्या / फळपिकांच्या झालेल्या नुकसानीबाबत संयुक्त पंचनामे करुन संयुक्त स्वाक्षरी अहवाल शासनास सादर करण्याच्या सूचना क्षेत्रीय अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत.

माहे एप्रलि, २०१९ मध्ये बीड व नांदेड जिल्हयात एकूण ८ व्यक्तींचा मृत्यू झाल्याचे दिसनू आले. सदर मृत व्यक्तींच्या वारसांना शासन निर्णय दिनांक १३.०५.२०१५ मधील तरतूदींनुसार प्रत्येकी र. ४ लक्ष प्रमाणे मदत वाटप करण्यात आलेली आहे.

माहे एप्रिल, २०१९ मध्ये बीड व नांदेड जिल्हयात एकूण ४२ जनावरांच्या मृत्यू झाल्याचे दिसून आहे. सदर मृत जनावरांच्या मालकांना शासन निर्णय दिनांक १३.०५.२०१५ मधील तरतूदींनुसार मदत देण्यात आली आहे.

(२) व (३) नांदेड शहरात दिनांक १७.०४.२०१९ रोजी वादळी वारा व विजांच्या कडकडासह झालेल्या पावसामुळे व्हीआयपी रोड विसावा गार्डनजवळ ३३ केव्ही सीआरसी वाहिनीवर मुळासहीन झाल उन्मळून पडल्यामुळे औद्योगिक वाहत उपकेंद्रातील विद्युत पुरवठा १७.१० ते ००.१५ वाजेपर्यंत बंद होता. सदर झाड वीज विज वाहिनीवरुन संपूर्णत: काढून घेतल्यानंतर वीज पुरवठा सुरळीत चालू झाला. वादळी वारे व जोराचा पाऊस १७.१० ते १८.०० वाजेपर्यंत

होते. चैतन्यनगर तरोडा व पावडेवाडी नाका आदी भागत सदर वादळी वारा व पावसाच्या कालावधीत वीज पुरवठा खंडीत झाला होता. त्यानंतर लगेच वीज पुरवठा सुरळीत झाला व सदर घटनेमुळे वीज ग्राहकांचे कोणत्याही प्रकारचे नुकसान झालेले नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कासराळी (ता.बिलोली, जि.नांदेड) येथील शासकीय बीजगुणन केंद्रात पेरणीअभावी लागवडीयोग्य जमीन ओस पडून असल्याबाबत**

**(३४) १३५४०१ (१५-०७-२०१९). श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कासराळी (ता.बिलोली, जि.नांदेड) येथील शासकीय बीजगुणन केंद्रात पेरणीअभावी ७४ हेक्टर लागवडीयोग्य जमीन ओस पडली असल्याचे माहे मार्च, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त केंद्रातील तालुका फलोत्पादन अधिकारी हे पद कमी करण्यात आले असुन कृषि पर्यवेक्षकच केंद्राचे काम पाहतात, मात्र सध्या या केंद्राची वाताहत झाली असुन या विभागाशी संबंधित या केंद्राकडे दुर्लक्ष करीत असल्याने ५० हेक्टर क्षेत्रात लागवड केली नसल्याने या पडीक जमिनीत बाभळीची व काटेरी झाडे वाढल्याने या परिसरात बाभुळवनाचे रुप आले असुन हे केंद्र नामशेष होण्याच्या मार्गावर आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कासराळी येथील ७४ हेक्टर लागवडीयोग्य जमीनाचा वापर पेरणीसाठी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अनिल बोंडे (१४-०८-२०१९) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) दिनांक १ जुलै २००९ पासून शासनाने फलोत्पादन अधिकारी हे पद आकृतीबंधानुसार कमी करुन कृषि पर्यवेक्षक यांच्याकडे तालुका बीजगुणन केंद्र प्रक्षेत्राचे काम सोपविण्यात आलेले आहे.

या प्रक्षेत्रावरील एकूण ८१.४४ हेक्टर क्षेत्रावर सन २०१८-१९ मध्ये २३.५० हेक्टर क्षेत्रावर खरीपाचे बीजोत्पादन कार्यक्रम घेण्यात आले. यामध्ये सोयाबीन २०.०० हे. उडीद १.५० हे. आणि तूर २.०० हे. पेरणी केली असून पावसाअभावी रब्बी बीजोत्पादन कार्यक्रम घेता आलेला नाही. तसेच, फळरोपवाटिके अंतर्गत नविन मातृवृक्ष एकूण २.५० हे. क्षेत्रावर लागवड करण्यात आले आणि १.०० हे. क्षेत्रावर हायब्रीड नेपीयर गवताची लागवड करण्यात आलेली आहे.

सन २०१९-२० मध्ये खरीप हंगामात ४०.०० हे. क्षेत्रावर बीजोत्पादन कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले होते, त्यापैकी ३५.२० हेक्टर क्षेत्रावर प्रत्यक्ष पेरणी करण्यात आलेली आहे तसेच फळबाग योजनेअंतर्गत कलमे/रोपांचे मोठ्या प्रमाणात उत्पादन करण्यात येत आहे. सदर उत्पादित कलमे/रोपे मग्रारोहयो फळबाग योजना व भाऊसाहेब फुंडकर फळबाग योजनेअंतर्गत तालुक्याच्या मागणीप्रमाणे कलमा/रोपांचे पूरवठा करण्याचे नियोजन करण्यात आलेले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईमधील गोवर रुबेला लसीकरणाबाबत**

**(३५) १३५५५० (१५-०७-२०१९). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती मंदा म्हात्रे (बेलापूर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), अॅड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईमध्ये दिनांक २७ नोव्हेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास गोवर आणि रुबेला लसीकरण करण्यात आले असुन सुमारे ८२ टक्के लसीकरण पूर्ण झाले असून पाच लाख बालके अजूनही लसीकरणाच्या प्रतिक्षेत असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भायखळा, कुर्ला (पश्चिम) आणि चेंबूर गोवंडी या भागातील काही शाळा अजूनही लसीकरण करुन घेण्यास तयार नसुन वांद्रे व सांताक्रुझमधील काही शाळांमध्ये लसीकरण करण्यास पालकांचा विरोध असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, गोवर रुबेला लसीकरणामुळे राज्यात किती लहान मुलांना बाधा होऊन मृत्यू झाला असुन सदर रुबेला लस ही केंद्र शासनाकडून राज्य शासनाला पुरविण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन लसीकरण करुन न घेणाऱ्या संबंधित शाळांवर कोणती करवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१९-०७-२०१९) :** (१) हे खरे नाही.

गोवर रुबेला मोहिमेत २२६७३६५ मुलांना मुंबई महानगरपालिकेतर्फे लसीकरण करण्यात आले. महाराष्ट्र शासनाने गोवर रुबेला मोहिमेत मुंबई महानगरपालिकेला दिलेल्या उद्दिष्टानूसार मुंबईमध्ये एकूण ९०.१ % उद्दिष्ट पूर्ण झाले आहे.

(२) अंशत: खरे आहे.

मुंबईतील काही शाळांना रुबेला लसीकरण करण्यास नकार दिला होता. त्या शाळेंचे योग्य तऱ्हेने समुपदेशन केल्यानंतर सदर शाळांनी लसीकरण सत्र आयोजित करण्यास होकार दिला. परंतु, काही शाळांनी मोहिम संपेपर्यंत लसीकरण करण्यास नकार दिला. तसेच काही शाळेतील पालकांनी गोवर रुबेला लसीकरण करण्यास नकार दिला ही बाब खरी आहे.

(३) मुंबईसह राज्यामध्ये गोवर रुबेला लसीकरणामुळे एकही लहान मुलांना बाधा होऊन मृत्यू झालेला नाही. सदर लस केंद्र शासनाकडून पुरविण्यात आली आहे.

(४) दि.२०/१२/२०१८ रोजी मा.आरोग्य मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली मुंबई येथे मौलवी/ धर्मगुरु, लोकप्रतिनिधी यांची बैठक आयोजित करण्यात आली व यामध्ये गोवर-रुबेला लसीचे महत्व समजावून सांगण्यात आले. तसेच त्यांना मार्गदर्शन करण्यात आले की त्यांच्या भागातील लसीकरणास नकार देणाऱ्या पालकांना लसीकरणाचे महत्व पटवून लसीरकरणास प्रवृत्त करण्यात यावे. राज्यस्तरावरुन शिक्षण विभागांतर्गत नकार देणाऱ्या शाळांमधील शिक्षकांना सहनियंत्रण अधिकारी म्हणून नेमण्यात आले व या शिक्षकांच्या मदतीने पालकांचे लसीकरणाबाबतच्या गैरसमज दूर करण्याबाबत प्रयत्न करण्यात आले व लसीकरण करण्यात आले आहे.

जागतिक आरोग्य संघटनेचे प्रतिनिधी, IAP/ IMA/रोटरी क्लबचे सदस्य यांनी नकार देणाऱ्या भागात/शाळांमध्ये जाऊन लसीकरणाचे महत्व समजवून सांगितले. राज्यस्तरावरुन प्रसिध्द पत्रकाची छपाई करण्यात आली. तसेच वेगवेगळया प्रसिध्दी माध्यमातून व्यापक प्रमाणात प्रसिध्दी करण्यात आली. उदा.प्रादेशिक व इंग्रजी वृत्तपत्रात सदर मोहिमेची जाहिरात, रेल्वे गाडयांवरती जाहिरात, रेडिओ वाहिनीवरुन कार्यक्रम प्रसिध्दी, रेल्वे फ्लायओवर पुलावर जाहिरात, पोस्टर्स, बॅनर्स, माहिती पत्रके इ. तसेच AEFI Kit सर्व लसीकरण केंद्रांवर उपलब्ध करुन देण्यात आल्या. तसेच IAP च्या सहकार्याने AEFI Management Centers तयार केले.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### हाजीअली (मुंबई) येथील समुद्र किनाऱ्याजवळच्या लोटस जेट्टीची दुरुस्ती करण्याबाबत

**(३६) १३५७८७ (०५-०७-२०१९). श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हाजीअली (मुंबई) येथील समुद्र किनाऱ्याजवळच्या लोटस जेट्टीची दुरुस्ती व विस्तारीकरणासाठी तातडीने निधी उपलब्ध करून देण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी लेखी निवेदनाद्वारे मा.राज्यमंत्री, मत्स्यविकास यांचेकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार व सदरहू मागणीच्या अनुषंगाने जेट्टीच्या दुरुस्ती व विस्तारीकरणासाठी आवश्यक निधी तातडीने उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (०७-०८-२०१९) :** (१) हे अंशत: खरे आहे.

स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा. पालकमंत्री, मुंबई शहर यांचेकडे जिल्हा वार्षिक योजनेतून दि.२१.०२.२०१९ च्या पत्राव्दारे निधी उपलब्धतेची मागणी केली आहे.

(२) होय.

(३) जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत मच्छिमार बंदराचा विकास करणे योजनेंतर्गत अनुज्ञेय कामांमध्ये दुरुस्तींच्या कामांचा समावेश नसल्याने लोट्स जेट्टीच्या दुरुस्तीचे काम हाती घेता येत नाही. परंतू जेट्टी विस्तारीकरणाचे काम जिल्हा वार्षिक योजना सन २०१९-२० मध्ये प्रस्तावीत करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वरळी (मुंबई) येथील मुख्य दुग्धशाळा, संलग्न इमारती, प्रशासकीय इमारतीसह निवासस्थानांच्या इमारतीच्या दुरुस्तीबाबत

**(३७) १३५९५० (०१-०७-२०१९). श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वरळी (मुंबई) येथील मुख्य दुग्धशाळा, संलग्न इमारती, प्रशासकीय इमारतीसह निवासस्थानांच्या इमारतींची सार्वजनिक बांधकाम विभागाकडून संरचनात्मक परिक्षण (Structural Audit) करण्यात आले असून सदरहु इमारती नादुरुस्त स्थितीत असल्याचे आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संरचनात्मक परिक्षण अहवालानुसार या इमारतींची संरचनात्मक दुरुस्ती व मजबूतीकरण केल्यास १० ते १५ वर्षे इमारतींचे वयोमान वाढू शकते, तसेच प्रत्येक ३ वर्षांनंतर इमारतींची सविस्तर पाहणी व संरचनात्मक परिक्षण करण्याबाबत परीक्षण अहवालात नमुद केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वरळी येथील या इमारतींच्या आवश्यक दुरुस्तीसाठी सन २०१८-१९ च्या अर्थसंकल्पिय अंदाजात रु.३.३४ कोटीची तरतूद करण्यात आली असली तरी सदरहू तरतूद या इमारतींच्या दुरुस्तीसाठी पुरेशी नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या इमारतींच्या दुरुस्ती व मजबुतीकरणासाठी अतिरिक्त निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (२१-०८-२०१९) :** (१) अंशत: हे खरे आहे.

(२) होय हे खरे आहे.

(३) व (४) सन २०१८-१९ दरम्यान सदर दुरुस्तीसाठी रु. ४.२१ कोटी इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. त्यानंतरही निधीच्या आवश्यकतेनुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील शेतक-यांच्या दुधाला २५ रुपये दर देण्याबाबत**

**(३८) १३७४१५ (०५-०७-२०१९). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात दूध पावडरचा दर १९० रुपयांवर असतानाही दुध संघ व दूध पावडर उत्पादक शेतक-यांच्या दुधाला २५ रुपयांऐवजी २० रुपये दर देऊन त्यांचे आर्थिक नुकसान करीत असल्याचे माहे मार्च, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधीत दुध संघ व दूध पावडर उत्पादक यांच्यावर कारवाई करुन शेतक-यांच्या दुधाला २५ रुपये दर देण्याबाबत शसनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (०५-०८-२०१९) :** (१) व (२) शासनाने दि.१/८/२०१८ ते दि.३१/१/२०१९ या कालावधीमध्ये प्रति लिटर रु.५/- असे अनुदान व दि.१/२/२०१९ ते ३०/४/२०१९ या कालावधीत रु.३/- प्रति लिटर अनुदान दुध उत्पादकांसाठी मंजूर केले होते. सदर अनुदानासह ३.५ व ८.३ या गुणप्रतीच्या दुधासाठी रु.२५/- प्रति लिटर असा खरेदी दर देण्याचे बंधन दुग्ध प्रकल्पधारकांवर घालण्यात आले होते. शासनाच्या या योजनेत ज्या दुग्धप्रकल्पधारकांनी सहभाग नोंदविला आहे त्या दुग्धप्रकल्पधारकांनी दुध उत्पादकांना प्रति लिटर रु. २५/- असा खरेदी दर दिला असून त्याबाबतची खातरजमा करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मेळघाटातील (जि.अमरावती) आदिवासींच्या आरोग्यासाठी ॲम्ब्युलन्स सेवा सुरु करण्याबाबत**

**(३९) १३७६२९ (१२-०७-२०१९). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्हयातील मेळघाटातील दुर्गम भागातील आदिवासींना जलदगतीने आरोग्य सेवा मिळण्यासाठी बाईक ॲम्ब्युलन्स सुरु करण्यात आली असुनही या बाईक ॲाम्ब्युलन्स पडुन असल्याचे दिनांक २२ एप्रिल, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आरोग्यसेवा विभागाने छत्तीसगड राज्याच्या धर्तीवर मेळघाटात बाईक ॲाम्ब्युलन्स सेवा सुरु केल्यामुळे टेंभुपाडा, व्हाटकुंभ, बैरागड व हरिसाल येथील प्राथमिक

आरोग्य केंद्रात आदिवासींच्या आरोग्य सेवेकरिता ऑम्ब्युलन्स उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या ॲब्युलन्स सध्या पडुन असल्याने मेळघाट मधील दुर्गम भागातुन रुग्णाना संबंधित प्राथमिक आरोग्य केंद्रात आणुन त्यांच्यावर पुढील उपचार करणे आदिवासी व इतरही नागरिकांना गैरसोयीचे होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन अमरावती जिल्हयातील मेळघाटातील आदिवासींना आरोग्य सेवा मिळण्यासाठी ऑम्ब्युलन्स सेवा सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१७-०७-२०१९) :** (१) हे अंशत: खरे आहे.

अमरावती जिल्हयामध्ये ५ बाईक ॲम्ब्युलन्स कार्यरत असून त्यापैकी ३ बाईक ॲम्ब्युलन्स सध्या चालू स्थितीत आहेत. तर टेंभूसोंडा व काटकुंभ, या ठिकाणच्या २ बाईक ॲम्ब्युलन्स दिनांक ०९/०४/२०१९ पासून ईमरजेन्सी मेडीकल टेकनिशन नोकरी सोडून गेल्यामुळे बंद आहेत.

(२), (३) व (४) महाराष्ट्र राज्यामध्ये मोटार बाईक रुग्णवाहिका सेवा दि.०२/०८/२०१७ पासून सुरु करण्यात आली आहे. सद्यस्थितीमध्ये ३० मोटार बाईक रुग्णवाहिकेद्वारे एकूण १९,९०२ रुग्णास सेवा देण्यात आली आहे. सद्यस्थितीत ३० रुग्णवाहिकांपैकी २८ रुग्णवाहिका सुस्थितीत सुरु आहेत.

| **अ.क्र.** | **बाईक रुग्णवाहिका क्र.** | **रुग्णवाहिका स्थान** | **सेवा दिलेल्या रुग्णांची संख्या** |
|---|---|---|---|
| १ | MH१२QL६४१९ | बैरागड | १४३० |
| २ | MH१२QL६४२३ | हथरु | १७६ |
| ३ | MH१२QL६४१३ | टेंभुसोंडा | १४१ |
| ४ | MH१२QL६४१८ | हरीसाल | ३१५ |
| ५ | MH१२QL६४२१ | काटकुंभ | ३९४ |

उपरोक्त तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे रुग्णांना या रुग्णवाहिकेद्वारे सेवा देण्यात आलेली आहे. टेंभूसोंडा व काटकुंभ या ठिकाणच्या २ बाईक ॲम्ब्युलन्ससाठी ईमरजेन्सी मेडीकल टेकनिशीयन यांची पदभरती प्रक्रिया सेवा पुरवठादारामार्फत सुरु असून लवकरच बाईक ॲम्ब्युलन्स सेवा सुरु करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**परांडा (जि.उस्मानाबाद) मतदारसंघात मंजूर चारा छावण्यांमध्ये शेळयामेंढयासाठी परवानगी मिळण्याबाबत**

**(४०) १३८१५१ (१५-०७-२०१९). श्री.राहुल मोटे (परांडा) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परांडा (जि.उस्मानाबाद) मतदारसंघात यंदा दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली असुन जनावरांसाठी चारा छावण्या मंजूर झालेल्या आहेत, हे खरे आहे काय.

(२) असल्यास, मंजूर झालेल्या चारा छावण्यांमध्ये शेळया मेंढयांसाठी परवानगी नसल्यामुळे शेळया मेंढयांचे चारा छावण्यां अभावी हाल होत असल्याबाबतच्या लेखी निवेदनाव्दारे स्थानिक लोकप्रतिनिधीनी शासनाकडे माहे मे, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान विनंती केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन परांडा मतदार संघातील शेळया मेंढयांसाठी चारा छावण्या तातडीने मंजूर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (२१-०८-२०१९) :** (१) होय.

(२) व (३) महसुल व वन विभाग, शासन पूरक पत्र दिनांक ३१ मे, २०१९ अन्वये राज्यातील सोलापूर, सातारा, सांगली, उस्मानाबाद, बीड, जळगाव, पुणे व अहमदनगर या ०८ जिल्हयात शेळ्या व मेंढ्यांसाठी छावण्या सुरू करण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे.

तसेच महसुल व वन विभाग, शासन पूरक पत्र दिनांक ३ जून, २०१९ अन्वये उपरोक्त ८ जिल्हयासह राज्यातील दुष्काळ घोषित केलेल्या इतर जिल्हयातही शेळ्या व मेंढ्याच्या छावण्या उघडण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे.

उस्मानाबाद जिल्हयात १९ व्या पंचवार्षिक पशुगणनेनुसार परांडा तालुक्यात २०८५५ शेळ्या-मेंढ्यांची संख्या असून शेळ्या-मेंढ्याच्या छावण्या सुरू करणेबाबत संबंधीत इच्छुक संस्था, सहकारी साखर कारखाने, सहकारी खरेदी विक्री संघ, कृषि उत्पन्न बाजार समिती, दुध खरेदी विक्री संघ तसेच सेवाभावी/स्वयंसेवी संस्था व इतर संस्था यांचा परिपूर्ण प्रस्ताव सादर करणेबाबत सुचना देण्यात आल्या आहेत. परंतू अद्यापपर्यंत शेळ्या-मेंढीसाठी छावण्या सुरू करण्याबाबतचा एकही प्रस्ताव प्राप्त झालेला नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात छावण्यातील जनावरांना चारा व पशु खाद्य देण्याबाबत**

**(४१) १३९२९६ (११-०७-२०१९). श्री.गणपतराव देशमुख (सांगोले) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात छावणीतील जनावरांना दररोज वाढीव चारा व एक किलो पशुखाद्य देण्याची मागणी दुष्काळग्रस्त भागातील शेतकऱ्यांनी माहे मे, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (२१-०८-२०१९) :** (१), (२) व (३) महसुल व वन विभाग, शासन निर्णय दिनांक ४ मे, २०१९ अन्वये दुष्काळी परिस्थिती विचारात घेता दैनंदिन पोषण व्यवस्थित होवून चारा छावण्यांमध्ये दाखल होणाऱ्या पशुधनांची रोग प्रतिकारक शक्ती आणि उत्पादन क्षमता कायम राहण्याकरिता त्यांना योग्य आहार देणे गरजेचे असल्याने दैनंदिन आहार हिरवा चारा, ऊसाचे वाडे, ऊस हे मोठे जनावरांसाठी १५ कि.ग्रॅ.वरून १८ कि.ग्रॅ. व लाहन जनावरांसाठी ७.५ कि.ग्रॅ.वरून ९ कि.ग्रॅ. इतके वाढविण्यात आले आहे. महसुल व वन विभाग, शासन निर्णय दिनांक २५ जानेवारी, २०१९ अन्वये छावणीत दाखल झालेल्या प्रति मोठया जनावरास १ किलो व लहान जनावरास १/२ पशुखाद्य आठवड्यातून ३ दिवस १ दिवसाआड देण्याचा शासन निर्णयही शासनाने घेतला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नांदगाव (जि.नाशिक) तालुक्यात बोंडअळीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत**

**(४२) १३९३४८ (११-०७-२०१९). श्री.पंकज भुजबळ (नांदगाव) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदगाव (जि.नाशिक) तालुक्यातील सन २०१७ च्या हंगामातील कपाशी पिकावर बोंडअळीच्या आक्रमणाने नष्ट झालेल्या पिकांचे पंचनामे होऊन शेकडो शेतक-यांना शासनामार्फत देण्यात येणा-या आर्थिक नुकसान भरपाईचे अनुदान मंजूर होवून देखील अद्यापपर्यंत तहसिल कार्यालयामार्फत अनुदान देण्यास दिरंगाई होत असल्यामुळे अनुदानास पात्र असलेल्या शेतक-यांमध्ये असंतोष निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केलेली आहे काय, चौकशीत काय आढळून आलेले आहे,
(३) असल्यास, त्यानुसार नांदगाव तालुक्यात बोंडअळीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (२१-०८-२०१९) :** (१) (२) व (३) खरीप हंगाम २०१७ मध्ये बोंडअळीच्या प्रादुर्भावामुळे कापूस पिकाच्या व तुडतुडे रोगाच्या प्रादुर्भावामुळे झालेल्या धान पिकाच्या नुकसानीकरीता नाशिक जिल्हयातील नांदगाव तालुक्यातील अनुदानपात्र शेतकऱ्यांना रक्कम रु. ३,०८,८७,४६३/- वाटप करणे आवश्यक होती. त्यापैकी रु. २,८४,३४,८११/- इतक्या रकमेचे अनुदान लाभार्थ्यांच्या बँक खात्यावर वाटप करण्यात आले. शिल्लक अनुदान रु. २४,५२,६५२/- बँक खात्यामध्ये तफावत, चुकीच्या बँक शाखा, चुकीच्या बँका, वारसांचे वाद, मयत खातेदार अशा चुका आढळून आल्याने सदर धनादेश बँकेकडून परत करण्यात आले त्यामुळे शेतकऱ्यांच्या खात्यावर सदर रक्कम जमा झालेली नाही. ज्या खातेदारांच्या बँक खात्यात

तफावत आढळून आली अशा सर्व संबंधित खातेदारांची सुधारीत माहिती प्राप्त करुन घेण्याची कार्यवाही सुरु असून, त्यानुसार संबंधित शेतकऱ्यांच्या खात्यावर अनुदान जमा करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नगर परिषद व नगर पंचायत भागातील शेतकऱ्यांना ग्रामिण भागातील शेतकऱ्यांप्रमाणे योजनांचा लाभ देण्याबाबत**

**(४३) १३९४४७ (१०-०७-२०१९). डॉ.देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना विविध योजनांचा लाभ दिला जात असुन नगर परिषद व नगर पंचायत भागातील शेतकऱ्यांना ग्रामीण भागातील शेतकऱ्यांप्रमाणे कोणत्याही योजनांचा लाभ देत नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ग्रामीण व शहरी असा भेदभाव निर्माण करून शासन नगर परिषद व नगर पंचायत भागातील शेतकऱ्यांवर अन्याय करीत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन नगर परिषद व नगर पंचायत भागातील शेतकऱ्यांना ग्रामिण भागातील शेतकऱ्यांप्रमाणे योजनांचा लाभ देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अनिल बोंडे (२०-०८-२०१९) :** (१) हे अंशत: खरे आहे.
शासनाचे धोरणानुसार केवळ डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजना व बिरसा मुंडा कृषि क्रांती योजना या दोन योजनांमध्ये नगर परिषद व नगर पंचायत भागातील शेतकऱ्यांना लाभ देण्यात येत नाही. कृषि विभागाच्या इतर सर्व योजनांमध्ये नगर परिषद व नगर पंचायत भागातील शेतकऱ्यांना ग्रामीण भागातील शेतकऱ्यांप्रमाणे लाभ देण्यात येतो.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सांगली जिल्हयातील दुधाचे दर कमी केल्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान होत असल्याबाबत**

**(४४) १३९४५३ (०५-०७-२०१९). श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर जिल्हा दूध संघ, गोकुळने गाईच्या दुध दरामध्ये कपात केल्यामुळे सांगली जिल्हयातील सर्व दूध संघानाही गाईच्या दुधाचे दर कमी करावे लागल्यामुळे सांगली

जिल्हयातील दुध उत्पादक शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत चौकशी करून सांगली जिल्हयातील दुध उत्पादक शेतकऱ्यांचे नुकसान होऊ नये यासाठी उपाययोजना करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (०५-०८-२०१९) : (**१) कोल्हापुर जिल्हा सहकारी दुध उत्पादक संघ, कोल्हापूर या संघाने दि.२१/०२/२०१९ ते २०/०५/२०१९ या कालावधीत सांगली जिल्हयातील मिरज तालुक्यातील दुध उत्पादकांच्या ३.५ / ८.५ या गुणप्रतीच्या दुधाकरिता रु.२०/- प्रति लिटर दिला होता हे खरे आहे. मात्र दि.२१/०५/२०१९ पासून सदर दर रु.२५/- प्रती लिटर असा सदर संघाकडून देण्यात येत आहे. तसेच सांगली जिल्हयातील सर्व दुध संघ दि.२१/०५/२०१९ पासुन दुध उत्पादकांना रु.२५/- प्रती लिटर असा दर देत आहेत.
(२) सांगली जिल्हयातील सर्व दुध संघांनी रु.२५/- प्रति लिटर असा दुध खरेदी दर दुध उत्पादकांना द्यावा अशा लेखी सुचना विभागीय उप निबंधक सहकारी संस्था (दुग्ध), पुणे यांच्या मार्फत देण्यात आलेल्या आहेत व त्याप्रमाणे रु.२५/- असा प्रती लिटर खरेदी दर संघाकडुन देण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**चिंचोशी (ता.खेड, जि.पुणे) येथील गोकुळेवाडी परिसरातील**
**शेतकऱ्याच्या कुटुंबाला आर्थिक मदत देण्याबाबत**

**(४५) १३९८६६ (११-०७-२०१९). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चिंचोशी (ता.खेड, जि.पुणे) येथील गोकुळेवाडी परिसरातील श्री.हरिदास महादू गोकुळे या शेतकऱ्याच्या अंगावर वीज पडून त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला असुन त्यांची पत्नी गंभीररित्या जखमी झाल्याचे दिनांक १६ एप्रिल, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वीज पडून मृत्यू झालेल्या शेतकऱ्याच्या कुटुंबाला तसेच गंभीररित्या जखमी झालेल्या महिलेस उपचारासाठी आर्थिक मदत मिळण्याबाबत शासनाकडे मागणी केली असूनही अद्यापपर्यंत शासकीय मदत मिळाली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन गोकुळेवाडी परिसरातील संबंधित मृत शेतकऱ्याच्या कुटुंबाला तसेच गंभीर जखमी झालेल्या महिलेस उपचारासाठी आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (१४-०८-२०१९) :** (१) होय.
(२) नाही.
(३) शासन निर्णय दिनांक १३.०५.२०१५ मधील तरतदींनुसार सदर घटनेमध्ये मृत्यूमुखी पडलेल्या श्री. हरिदास महादू गोकुळे यांच्या कुटुंबियांना रु. ४ लक्ष एवढी मदत देण्यात आली असून, श्रीमती अंजना हरिदास गोकुळे व श्रीमती रुपाली बाळासाहेब गोकुळे यांना प्रत्येकी रु. १२,७००/- एवढी मदत वाटप करण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अमरावती जिल्हयात चक्रीवादळात नुकसान झालेल्या केळी उत्पादक शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत**

**(४६) १४१९२५ (११-०७-२०१९). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.मोहन फड (पाथरी) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती जिल्हयात दिनांक ८ जून, २०१८ रोजी वा त्यासुमारास झालेल्या चक्री वादळात नुकसान झालेल्या केळी उत्पादक शेतकऱ्यांना तातडीने नुकसान भरपाई देण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी जिल्हाधिकारी, अमरावती यांचेकडे दिनांक २९ सप्टेंबर, २०१८ वा त्यासुमारास केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (२१-०८-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) माहे जून ते ऑगस्ट, २०१८ मध्ये अतिवृष्टीमुळे शेतिपिकांच्या / फळपिकांच्या झालेल्या नुकसानीसाठी दिनांक १० जुलै, २०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये अमरावती विभागास रु. ४३५१.२३ लक्ष इतका निधी मंजूर करण्यात आला आहे. त्यात अमरावती जिल्हयाचा समावेश आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबई आणि ठाण्यातील डेअरींमध्ये मिळणाऱ्या म्हशीच्या दूधाच्या दरात दोन रुपयांनी वाढ केल्याबाबत**

**(४७) १४२०६८ (०५-०७-२०१९). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी),**

**श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई आणि ठाण्यातील डेअरींमध्ये मिळणाऱ्या म्हशीच्या दूधाच्या दरात दिनांक १ एप्रिल, २०१९ पासून दोन रुपयांनी वाढ करण्याचा निर्णय १७०० डेअरी मालक सदस्य असलेल्या मुंबई मिल्स असोसिएशनने घेतल्यामुळे ग्राहकांना एक लिटर दूधासाठी किरकोळ बाजारात ७० ते ७५ रुपये मोजावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे ग्राहकांना दुधासाठी विविध ठिकाणी वेगवेगळे दर मोजावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करुन राज्यात सर्वत्र दूधासाठी एकच दर ठेवण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (०५-०८-२०१९) :** (१) मुंबई आणि ठाण्यातील डेअरीमधुन विक्री करण्यात येणा-या म्हशीच्या दुधात दि.०१.०४.२०१९ पासून रु.२/- प्रतिलिटर वाढ करण्याचा निर्णय मुंबई मिल्क असोशिएशनने घेतला आहे. हे खरे आहे.

मात्र ठाणे जिल्हयातील परिसरात खाजगी तबेल्यातील सद्यस्थितीत म्हशीचे दूध थेट ग्राहकांना रु.६०/- ते रु.६५/- प्रतिलिटर दराने विक्री होत असुन विविध दुग्ध प्रकल्पाचे पिशवी बंद म्हशीचे दूध (६.०/९.०) या गुणप्रतीसाठी विक्री दर रु.५५/- ते रु.५६/- प्रति लिटरच्या दरम्यान असल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) व (३) जीवनावश्यक वस्तु अधिनियम १९५५ मधील तरतुदीनुसार दुधासाठी किमान आधारभुत किंमत निश्चित करण्याचे अधिकार केंद्र शासनास आहेत. सद्यस्थितीत दुधासाठी किमान आधारभुत किंमत निश्चित करण्यात आलेली नाही. त्यामुळे राज्यात दुध खरेदी व विक्रीचे दर हे निरनिराळे आहेत. दुधासाठी किमान आधारभुत किंमत निश्चित करण्याबाबत राज्य शासनाने यापूर्वीच केंद्र शासनास विनंती केली असुन यासंदर्भात केंद्र शासनाने अद्यापी राज्य शासनास कळविलेले नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चांदूर रेल्वे, धामनगाव रेल्वे, नांदगाव खडेश्वर (जि.अमरावती) या तालुक्यात अतिवृष्टीमुळे खरडुन गेलेल्या जमिनीसह पिकांची नुकसान भरपाई देण्याबाबत

**(४८) १४२०८५ (११-०७-२०१९). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चांदूर रेल्वे, धामनगाव रेल्वे, नांदगाव खडेश्वर (जि.अमरावती) या तालुक्यात दिनांक ९ ते ११ जुलै २०१८ या कालावधीत अतिवृष्टीमुळे जमीन खरडुन गेल्याने जमिनीचे तसेच पिकांचे नुकसान झाले असून विशेषता: नांदगाव खडेश्वर तालुक्यात मोठ्या प्रमाणात नुकसान झाले

असल्याचे प्रशासनाकडून करण्यात आलेल्या सर्वेक्षण व पंचनाम्यात आढळून आले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर खरडुन गेलेल्या जमिनीचे व नुकसान झालेल्या पिकांचे सर्वेक्षण व पंचनामे करून नुकसान भरपाईचा प्रस्ताव विभागीय आयुक्त, अमरावती यांच्याकडून दिनांक १९ नोव्हेंबर २०१८ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे सादर केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर खरडुन गेलेल्या जमिनीचे व नुकसान झालेल्या पिकांची नुकसानभरपाई देण्याबाबत मा.महसूल मंत्री, प्रधान सचिव, मदत व पुनर्वसन यांना दिनांक २१ फेब्रुवारी २०१९ रोजी वा त्यासुमारासच्या पत्रान्वये लेखी कळविले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन चांदूर रेल्वे , धामनगाव रेल्वे , नांदगाव खडेश्वर या तालुक्यात अतिवृष्टीमुळे खरडुन गेलेल्या जमिनीसह पिकांची नुकसान भरपाई देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करणार येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (२१-०८-२०१९) :** (१), (२) व (३) होय.

(४) माहे जून ते ऑगष्ट, २०१८ या कालावधीत अतिवृष्टीमुळे जमीन खरडुन / वाहून गेलेल्या क्षेत्रासाठी अमरावती जिल्ह्याकरीता रु. ९९.३३ लक्ष इतकी मदत देण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सोयगाव (जि.औरंगाबाद) तालुक्यातील फळबाग उत्पादक शेतकरी दुष्काळाच्या अनुदानापासून वंचित राहिल्याबाबत

**(४९) १४२२६२ (११-०७-२०१९). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोयगाव (जि.औरंगाबाद) तालुक्यातील दुष्काळाने नुकसान झालेल्या शेतक-यांना जिल्हाधिकारी कार्यालयाकडून नुकसानापोटी मंजूर झालेल्या निधीमधून एक कोटी निधी तातडीने कन्नड तालुक्याला देण्यात आल्याने सोयगाव तालुक्यातील फळबाग उत्पादक शेतकऱ्यांना दुष्काळाच्या अनुदानापासून वंचित रहावे लागल्याचे माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सोयगाव तालुक्यातील फळबाग उत्पादक शेतक-यांना नुकसानपोटी मंजूर झालेला निधी तातडीने उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

वि.स. ५९० (40)

**श्री. सुभाष देशमुख (०८-०८-२०१९) :** (१) (२) व (३) हे खरे नाही.

औरंगाबाद जिल्हयाकरीता खरीप-२०१८ हंगामातील दुष्काळी परिस्थितीच्या अनुषंगाने बाधित शेतकऱ्यांना वाटप करण्यासाठी एकूण रुपये ३७६,७६,१०,०००/- एवढा निधी औरंगाबाद जिल्हयास वितरीत करण्यात आला होता.

औरंगाबाद जिल्हयातील तहसिलदार सोयगांव यांना रुपये २१,२१,९४,५४०/- इतका निधी वितरीत केला होता. त्यापैकी तसहसिलदार सोयगांव यांच्याकडे तयार असलेल्या यादीतील २३४५७ बाधित शेतकऱ्यांच्या बँक खात्यात रुपये २०,२१,९४,५४०/- इतका निधी वर्ग करण्यात येऊन उर्वरित रक्कम रुपये १,००,००,०००/- एवढा निधी बाधित शेतकऱ्यांच्या यादया तयार नसल्याने व प्राप्त निधी ३१ मार्च पूर्वी खर्च करणे आवश्यक असल्याने सदर निधी जिल्हाधिकारी कार्यालयास समर्पित करण्यात आला. तहसिदार वैजापूर यांच्याकडे बाधित शेतकऱ्यांचे बँक खाते क्रमांक उपलब्ध असल्याने तहसिलदार सोयगांव यांनी समर्पित केलेला निधी जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांनी तहसिलदार वैजापूर यांच्याकडे वर्ग केला.

सोयगांव तालुक्यातील फळबाग उत्पादक शेतकऱ्यांना अनुदान वितरीत करण्यासाठी तहसिलदार, सोयगांव यांच्या मागणीनुसार विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांच्याकडून प्राप्त प्रस्तावाच्या अनुषंगाने औरंगाबाद विभागास शासन निर्णय शासन निर्णय दिनांक १५/०७/२०१९ अन्वये एकूण रुपये ३९०,२५,३४,०००/- इतका निधी अर्थकल्पीय प्रणालीद्वारे उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## केंद्राकडून दुष्काळनिधी मिळण्याबाबत

**(५०) १४३०९४ (१५-०७-२०१९). श्री.बसवराज पाटील (औसा) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील दुष्काळी परिस्थितीमुळे केंद्र सरकारने एकूण २,१६० कोटी रुपयांचा निधी मंजुर केल्याचे दिनांक ८ मे, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले असुन त्यापैकी एकूण १११ कोटी ८७ लाख रुपये रक्कम मराठवाडा विभागात सुरु करण्यात आलेल्या चारा छावण्यांना देण्यासाठी प्रशासनाला देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दुष्काळी परिस्थिती आणि फळबागांसह रब्बी पिकांच्या झालेल्या नुकसानीच्या आधीच्या सरकारांनी दिलेल्या मदतीच्या तुलनेत सदर मदत अतिशय कमी असल्याने राज्य सरकार अतिरिक्त निधीची मागणी केंद्र सरकारकडे करणार आहे काय,

(३) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (२१-०८-२०१९) :** (१) दिनांक २० फेब्रुवारी, २०१९ च्या पत्रान्वये खरीप हंगाम २०१८ मधील दुष्काळासाठी केंद्र शासनाने राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद निधीमधून रूपये ४५६२.८८ कोटी इतका मदत निधी राज्यास मंजूर केला आहे. त्यापैकी राज्यास रूपये ४२४८.५९ कोटी निधी प्राप्त झाला आहे.

राज्यामध्ये दुष्काळी परिस्थितीमुळे सुरू करण्यात आलेल्या चारा छावण्यांना सन २०१९-२० मध्ये अर्थसंकल्पीत तरतूदीमधून निधी वितरीत केला आहे. यामध्ये महसुल व वन विभाग, शासन निर्णय क्र. एससीवाय-०४/२०१९/प्र.क्र.२६/म-११, दिनांक ४ मे, २०१९ अन्वये रूपये १११.८७ कोटी इतका निधी विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना वितरीत केला आहे.
(२) खरीप २०१८ दुष्काळाच्या अनुषंगाने केंद्र शासनाने भरीव निधी मंजूर केला असल्याने अतिरिक्त निधीची मागणी करण्यात आलेली नाही.

महसुल व वन विभाग, शासन निर्णय क्र. एससीवाय-२०१८/प्र.क्र.२३७/म-७, दिनांक ६ जुलै, २०१९ अन्वये राज्यातील रब्बी २०१८-१९ हंगामातील दुष्काळी परिस्थितीच्या अनुषंगाने सोलापूर जिल्ह्यातील बार्शी, उत्तर सोलापूर व चंद्रपूर जिल्ह्यातील बल्लारपूर या ३ तालुक्यांसाठी एकुण रूपये ५६.६१ कोटी निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**सचिव**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.